दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -१२१ | सोमवार दि.०५ जानेवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-121 | Monday, Dt.05 January 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## अंबाजोगाई लोखंडी रोडवर उसाच्या ट्रॅक्टरला ऑटोची भीषण धडक





अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरातील लोखंडी रोडवर विजय हॉटेलसमोर आज सायंकाळी सुमारे ६.२५ वाजता भीषण अपघात घडला. सकाळपासून रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या उसाने भरलेल्या ट्रॅक्टरला मागून येणाऱ्या ऑटोने जोरदार धडक दिली. या अपघातात ऑटोतील चार प्रवासी गंभीर जखमी झाले असून, परिसरात एकच खळबळ उडाली.

या अपघातात ऑटो चालक बाळासाहेब सर्जेराव ठाकूर (वय ३०), प्रियंका बाळासाहेब ठाकूर (वय २६), साहेबराव गंगाधर साखरे (वय ३८) व ऋतुराज लक्ष्मण साखरे (वय ११),सर्व रा. कानडी बदन) हे गंभीर जखमी झाले आहेत. सर्व जखमींना डोके, पाय व डोळ्यांना गंभीर स्वरूपाच्या दुखापती झाल्या असून, त्यांना तातडीने स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथे दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर ऑटोची धडक इतकी तीव्र होती की ऑटोचे लोखंडी भाग दबल्याने चालकासह प्रवासी आत अडकून पडले होते. याच वेळी केजकडून अंबाजोगाईकडे येत असलेले ‘सिटीझन’ पेपरचे पत्रकार शेख फिरोज यांनी अपघातस्थळी थांबून प्रसंगावधान दाखवले. त्यांनी तात्काळ परिस्थितीची गंभीरता ओळखून १०८ व ११२ या आपत्कालीन क्रमांकावर फोन करून रुग्णवाहिका व मदत यंत्रणा बोलावली.


तसेच अजंठा ऑटोमोबाईल्सचे मालक वाजेत शेख व स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने ऑटोमध्ये अडकलेल्या जखमींना मोठ्या प्रयत्नांनी बाहेर काढण्यात आले. पत्रकार शेख फिरोज यांच्या तत्परतेमुळे जखमींना वेळेत वैद्यकीय मदत मिळाल्याने पुढील अनर्थ टळल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

दरम्यान, सकाळपासून पंचर अवस्थेत रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रॅक्टरच्या मागील बाजूस रेडियम अथवा इशारा फलक नसल्यामुळेच हा अपघात घडल्याचा आरोप जखमींच्या नातेवाईकांनी केला आहे. संबंधित ट्रॅक्टर चालक व मालकावर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी नातेवाईक व नागरिकांनी केली आहे.

## बीडमध्ये कार आणि रिक्षाचा भीषण अपघात

## दोन चालक गंभीर जखमी

### प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अपघातांचे सत्र सुरूच; नागरिकांमधून व्यक्त होतोय तीव्र संताप



बीड (प्रतिनिधी)

बीड-परळी रोडवरील बार्शी नाका ते तेलगाव नाका दरम्यान रविवारी सायंकाळी चारचाकी आणि ऑटोरिक्षाची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात दोन्ही वाहनांचे चालक गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ४ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास हा अपघात घडला. चारचाकी क्रमांक MH 23 Q 1212 ही बार्शी नाक्याकडून तेलगाव नाक्याच्या दिशेने जात होती. दरम्यान, समोरून चुकीच्या दिशेने (राँग साईड) येणाऱ्या ऑटोरिक्षाने या कारला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.अपघातानंतर रस्त्यावर बघ्यांची मोठी गर्दी झाली होती, ज्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीएसआय उबाळे, पथकातील कर्मचारी भोले, असलम आणि सानप यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जखमींना रुग्णालयात हलवून रस्त्यावरील वाहतूक सुरळीत केली.बार्शी रोड ते तेलगाव नाका या मार्गावर वळण रस्ता किंवा योग्य ’कट’ नसल्यामुळे येथे वारंवार अपघात होत आहेत. यापूर्वीही अनेक निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. तरीही सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) कोणतीही ठोस उपाययोजना करत नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संबंधित विभागाने तातडीने पथदिवे सुरू करावेत आणि रखडलेले रस्ते दुरुस्तीचे काम पूर्ण करावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### राज्यात मतदानापूर्वीच ६७ उमेदवार विजयी

## भाजपाचे सर्वाधिक नगरसेवक, शिंदेंच्या शिवसेनेनेही मारली बाजी



मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील २९ महापालिका निवडणुकींसाठी मतदान होण्यास अवघे १२ दिवस शिल्लक आहेत आणि निकाल जाहीर व्हायला १३ दिवस बाकी आहेत. मात्र, या निवडणुकांआधीच राज्यभरात एकूण ६७ उमेदवारांची नगरसेवकपदी बिनविरोध निवड झाली आहे.निवडणुका बिनविरोध करण्यात भाजपाने आघाडी घेतली अजून आतापर्यंत भाजपाचे ४५ उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. त्यापाठोपाठ निवडणुका बिनविरोध करण्यात शिंदेंच्या शिवसेनेने दुसरा क्रमांक पटकावला आहे. शिंदेंच्या शिवसेनेचे तब्बल १९ नगरसेवक बिनविरोध विजयी झाले आहेत.

कल्याण-डोंबिवलीत भाजपचे सर्वाधिक १५ उमेदवार तर शिवसेनेचे ६ उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. त्यानंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे २ तर मालेगावमधून इस्लाम पार्टीचे एक उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. दरम्यान, राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे.

## निवडणुकीच्या प्रचारात ‘लाडक्या बहिणी’ केंद्रस्थानी

### मकर संक्रांतीनिमित्त ‘वाणा’वरही प्रचार; प्रचाराच्या साहित्यात साडी, मंगळसूत्र, टिकल्या, झुमक्यांना विशेष मागणी




मुंबई : प्रतिनिधी

यंदाची महापालिका निवडणूक मकरसंक्रांतीच्या काळात होत असल्याने प्रचार साहित्यांवर सणाची छाप स्पष्टपणे दिसून येत आहे. मकरसंक्रांतीनिमित्त महिलांकडून वाटल्या जाणा-या ‘वाणा’वरही निवडणुकीचा प्रचार रंगताना दिसत आहे. विशेष म्हणजे, प्रचारात महिलांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले असून ‘लाडक्या बहिणीं’साठी खास साहित्य तयार करण्यात आले आहे.

प्रचारासाठी कार्यकर्त्यांना थंडीपासून संरक्षण मिळावे, याचीही काळजी घेण्यात आली आहे. पारंपरिक रुमाल, दुपट्टे आणि टोप्यांसह हुडी, साड्या, टिकल्या, मंगळसूत्र, हळदी-कुंकूचे करंडे अशी विविध प्रचार सामग्री उपलब्ध झाली आहे. एकूणच यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार सणासुदीच्या पार्श्वभूमीवर महिलाभिमुख आणि विशेष स्वरूपाचा ठरणार, हे निश्चित आहे.

महानगरपालिका निवडणुकीत ५० टक्के महिला आरक्षण लागू असले, तरी यंदा निवडणूक प्रचार साहित्यावर १०० टक्के महिलांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवत आहे. प्रचार साहित्य खरेदीसाठी येणा-या उमेदवारांकडूनही लाडक्या बहिणींना आकर्षित करणा-या साहित्यालाच सर्वाधिक मागणी आहे.

तब्बल ७ ते ८ वर्षांनंतर महानगरपालिका निवडणूक होत असल्याने इच्छुक उमेदवारांची संख्या मोठी आहे. त्यामध्ये महिला उमेदवारांचे प्रमाण लक्षणीय आहे. विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींनी महायुती सरकारला निर्णायक पाठिंबा दिला होता. त्यामुळे ‘मिनी विधानसभा’ समजल्या जाणा-या या निवडणुकीतही महिला मतदारांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर यंदाचे प्रचार साहित्य महिलांचा विचार करून खास तयार करण्यात आले असून, लाडक्या बहिणींना केंद्रस्थानी ठेवून प्रचाराची रणनीती आखण्यात आली आहे.

साड्यांचेही विशेष आकर्षण

राज्यात थंडीत प्रचार करणे आव्हानात्मक ठरत असताना, नेत्यांचे फोटो असलेली हुडी आणि साड्या प्रचारात आकर्षण ठरत आहेत. मध्य भारतात थंडीचा जोर मोठ्या प्रमाणात वाढला असून, कडाक्याच्या थंडीत कार्यकर्ते घराबाहेर पडण्यास कचरतात, त्यामुळे उमेदवारांच्या प्रचारावर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. ही अडचण लक्षात घेऊन उमेदवारांनी आणि पक्षनेत्यांनी कार्यकर्त्यांसाठी विशेष प्रकारच्या हुडी तयार केल्या आहेत. या हुडी घालून कार्यकर्ते थंडीपासून संरक्षण करत प्रचारात जोमाने सहभागी होत आहेत. विशेष म्हणजे, यंदा केवळ पुरुष कार्यकर्त्यांचाच नव्हे, तर महिला कार्यकर्त्यांचाही विचार करण्यात आला आहे.

## शहागडमध्ये घरकुल योजनेच्या नावाखाली कोट्यवधींचा कागदोपत्री घोटाळा

### एकही वीट न रचता अनुदान लाटले;अधिकारी-अभियंत्यांचे हात रंगेहात अडकले असल्याचा आरोप

शहागदचा “कागडोपत्री” वेकस!




शहागड (प्रतिनिधी)

गरिबांच्या हक्काच्या घरकुल योजनेवर डल्ला मारत शासनाच्या तिजोरीची खुलेआम लूट केल्याचा धक्कादायक प्रकार अंबड तालुक्यातील शहागड येथे उघडकीस आला आहे. २०२३ ते २०२५ या कालावधीत प्रत्यक्षात एकही घर न बांधता केवळ कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून लाखो रुपयांचा अपहार केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे.या प्रकरणामुळे पंचायत राज व्यवस्थेतील भ्रष्टाचाराचा घाणेरडा चेहरा पुन्हा एकदा समोर आला आहे.या घोटाळ्याप्रकरणी ग्रामविकास अधिकारी व अभियंत्यांविरुद्ध अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली असून प्रशासनाने तातडीची कारवाई न केल्यास १५ जानेवारी २०२६ पासून आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.मौजे शहागड येथे पंतप्रधान आवास योजना,रमाई आवास योजना आणि ओबीसी घरकुल योजना अंतर्गत अनेक लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाली. शासनाच्या नियमानुसार बांधकामाच्या टप्प्यानुसार अनुदान अदा करणे बंधनकारक आहे.मात्र प्रत्यक्षात घरकुलांचे कोणतेही बांधकाम झालेले नसताना काम पूर्ण झाल्याचे खोटे अहवाल सादर करून शासनाचा पैसा हडप करण्यात आल्याचा आरोप तक्रारदार संभाजी बप्पासाहेब अडगळे यांनी केला आहे.या कथित भ्रष्टाचारात अभियंता मोहन नवखंडे,पवन राठोड आणि ग्रामविकास अधिकारी व्ही.एम.

(उर्वरीत पान २ वर)



## राष्ट्रीय खो-खो स्पर्धेपूर्व तयारीला वेग

**बीडमध्ये मॅट प्रशिक्षण शिबिराचा ऐतिहासिक प्रारंभ**


बीड /प्रतिनिधी

५८ व्या राष्ट्रीय पुरुष व महिला खो-खो स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांचे स्पर्धापूर्व मॅट प्रशिक्षण शिबीर राजर्षी शाहू कन्या विद्यालय, तेलगाव नाका, बीड येथील क्रीडांगणावर सुरू झाले असून, या ऐतिहासिक प्रशिक्षण शिबिराचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला.

या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटक व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी मॅटवरील मध्यभागी असलेल्या मध्यस्तंभाला नारळ फोडून प्रशिक्षण शिबिराचे औपचारिक

(उर्वरीत पान २ वर)

## गोरगरिबांच्या अन्नधान्यावर डुकरांचा ताबा



मंठा शासकीय गोदामात अक्षम्य हलगर्जीपणा – प्रशासनाची डोळेझाक की संगनमत?

डॉ आशिष तिवारी/मंठा

तालुक्यातील गोरगरिब, मजूर, कष्टकरी जनतेच्या ताटात जाणाऱ्या अन्नधान्याची उघड उघड विटंबना मंठा येथील शासकीय अन्नधान्य गोदामात सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.या गोदामात डुकरांचा मुक्त संचार सुरू असून, गहू-तांदूळ साठवलेल्या कट्ट्यांवर डुकरं थेट तोंड लावत असल्याचे भेसूर चित्र नागरिकांनी प्रत्यक्ष पाहिले आहे.हीच का गोरगरिबांच्या अन्नधान्याची

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

# अमोल भैय्या चौधरी यांचा ६ जानेवारी रोजी भव्य अभिष्टचिंतन सोहळा

आष्टी - (प्रतिनिधी) धामणगाव, ता. आष्टी येथील युवकांचे नेतृत्व, सामाजिक कार्यात सातत्याने कार्यरत असलेले व सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी नेहमीच पुढाकार घेणारे अमोल (भैय्या) चौधरी यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार, दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अमोल (भैय्या) चौधरी मित्र परिवार यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यामुळे धामणगावसह संपूर्ण आष्टी तालुक्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अमोल चौधरी हे युवकांमध्ये प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. सामाजिक, शैक्षणिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात त्यांचे कार्य सर्वपरिचित असून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी नेहमीच सक्रिय सहभाग घेतला आहे. समाजातील दुर्बल घटकांसाठी मदतीचा हात, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न तसेच युवकांना सकारात्मक दिशेने मार्गदर्शन करण्याचे कार्य ते सातत्याने करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा अभिष्टचिंतन सोहळा केवळ आनंदोत्सव न राहता सामाजिक जाणीवेचा संदेश देणारा उपक्रम ठरणार आहे.

या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजल्यापासून सायंकाळी ८:३० वाजेपर्यंत स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्नेहभोजनाच्या माध्यमातून गावातील नागरिक, मित्रपरिवार, आप्तेष्ट, विविध क्षेत्रातील मान्यवर एकत्र येऊन शुभेच्छांचा वर्षाव करणार आहेत. सर्वांसाठी खुले असलेले हे स्नेहभोजन आपुलकी व सामाजिक सलोख्याचे प्रतीक ठरणार आहे. यानंतर सायंकाळी ९ ते रात्री १२ वाजेपर्यंत सुप्रसिद्ध गायिका कोमलताई पाटोळे (मेंढापुरकर) यांचा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम



आयोजित करण्यात आला आहे. त्यांच्या सुमधुर गायनामुळे व लोकप्रिय गीतांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमास मोठ्या संख्येने रसिक उपस्थित राहण्याची शक्यता असून हा कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत रंगणार आहे.

वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याच्या उद्देशाने या दिवशी विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये गरजू शालेय विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार असून त्यामुळे त्यांच्या शिक्षणाला हातभार लागणार आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी, आजारांबाबत मार्गदर्शन व आवश्यक सल्ला देण्यात येणार आहे. यासोबतच शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण होऊन शारीरिक व मानसिक विकासाला चालना मिळणार आहे. विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करून त्यांचे कौतुक करण्यात येणार आहे.

हा संपूर्ण अभिष्टचिंतन सोहळा धामणगाव येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक समोर आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मित्र परिवार, युवक कार्यकर्ते व स्वयंसेवक परिश्रम घेत असून नियोजनबद्ध पद्धतीने सर्व उपक्रम राबविले जाणार आहेत. कार्यक्रमास सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार असल्याची माहिती आहे. या भव्य अभिष्टचिंतन सोहळ्यास धामणगाव व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अमोल (भैय्या) चौधरी यांना शुभेच्छा द्याव्यात व कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय....

# मराठी साहित्य संमेलनाची खरी कथा

शतकपूर्व शेवटचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संभाजीपुत्र छत्रपती शाहू महाराज यांनी वसवलेल्या ऐतिहासिक सातारा नगरीत चार दिवस होत आहे, ही आनंदाची बाब आहे. ९९ वर्ष एखादा संस्कृती उत्सव सलग होतो ही निश्चितच आपण मराठी माणूस म्हणून अभिमानाची गोष्ट आहे. या सांस्कृतिक महोत्सवाला नेहमीच शासकीय आर्थिक पाठबळ लाभलेले आहे, ही गोष्ट महत्त्वाची आहे. परंतु या ठिकाणी नोंदविले पाहिजे की, सर्व जाती-धर्मातील, मराठी साहित्याची सेवा करणाऱ्या जरी स्वतःला अखिल भारतीय म्हणवून जागतिक मराठी साहित्य संमेलन घेत असले तरी ते सर्वांना सामावून घेण्यात कमी पडले आहेत. म्हणूनच मराठी मुस्लिम साहित्य संमेलन, विद्रोही साहित्य संमेलन, समांतर साहित्य संमेलन, बाल साहित्य संमेलन, स्त्री लेखिकांचे व स्त्रीसाहित्य संमेलन अशी वेगवेगळी साहित्य संमेलने होतात, करावी लागतात. याच्यावर अखिल भारतीय साहित्य संमेलन आयोजित करणाऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषदेला विचार करावा वाटत नाही ही शोकांतिका आहे. अभिजनांच्या, उच्चवर्गीयांच्या, वरिष्ठ जातीच्या, सत्ताधाऱ्यांच्या 'हो' ला 'हो' करणाऱ्या आणि त्यांच्या राजकीय भूमिकेला (जे आरक्षणविरोधी, धर्म आणि जातीमध्ये तेढ निर्माण करणारी, स्त्रीविरोधी आहे) साथ देणाऱ्या लोकांच्या ताब्यातील साहित्य संमेलन आहे. अल्पसंख्यांक, स्त्रिया, दलित, आदिवासी, युवक, शेतकरी, कामगार, ग्रामीण, गरीब यांच्या जगण्याचे मूलभूत संघर्षाचे मुद्दे साहित्यात आणले जात नाहीत. मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, फॅशनेबल पद्धतीने लिखाण करणाऱ्या, राजकीय भूमिका न घेणाऱ्या, सत्ताधाऱ्यांची कानउघाडणी न करणाऱ्यांना सामावून घेतले जाते; पण लढणाऱ्या आणि साहित्य निर्मिती करणाऱ्या लोकांना या मुख्य प्रवाहात सामावून घ्यायला मराठी साहित्य परिषद आणि साहित्य संमेलन कमी पडलेले आहे. मुख्य धारेतील लेखक, वरच्या जातीतील, आपल्या कोषातून बाहेर न पडणारे, तथाकथित लेखक, प्रकाशक जे आपली पुस्तके विकत असतात त्यांना या साहित्य संमेलनाकरिता करदात्यांच्या खिशातील पैसे शासनाने का द्यावेत? हा खरा प्रश्न आहे.

## जाहीर प्रगटन पेपर

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १९२१/२०२५**
CNR No. MHBI0200002025
**आशा पांडुरंग गोरकर व ईतर ४ वि. निरंक**
**(मार्फत ॲड. जे. डी. पांडव)**
**अर्जदार :-**
**१. श्रीमती आशा पांडुरंग गोरकर, वय-६७ वर्षे, धंदा-पेन्शनर, रा. १-६-६१९ पुण्याई जगदंबा हौसिंग सोसायटी शाहुनगर, बीड ता. जि. बीड**
**२. प्रसाद पांडुरंगराव गोरकर, वय-३३ वर्षे, धंदा-नौकरी, रा. १-६-६१९ पुण्याई जगदंबा हौसिंग सोसायटी शाहुनगर, बीड ता. जि. बीड**
**३. प्राजक्ता मिलिंद कल्याणकर, वय-४२ वर्षे, धंदा-नौकरी, रा. सी-११०१, वेलवर्थ टिन्सेल टाउन, सर्व्हे नं. १९/१/२/३/४ एमडीए पाशान रोडा, बावधन, पुणे**
**४. अमृता मंगेश मंगरूळकर, वय-४१ वर्षे, धंदा-नौकरी, रा. पुण्याई जगदंबा हौसिंग सोसायटी शाहुनगर, बीड ता. जि. बीड**
**५. नम्रता सागर उंटवाले, वय ३७ वर्षे, धंदा-नौकरी, रा. ग्रीन वैली, फ्लॅट बी-२०४ स.नो. २५७/१/२ कस्पटे वस्ती, वाकड, पुणे**
**विरुध्द निरंक**
**मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.**

वरील अर्जदार क. १ ते ५ यांनी या न्यायालयात पांडुरंग अंबादासराव गोरकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत पांडुरंग अंबादासराव गोरकर यांचा मृत्यु दिनांक १९/०९/२०२५ रोजी झाला वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे व अर्जदार क. ३ ते ५ या मयताच्या विवाहित गुली आहेत तसेच मयताची आई दिनांक २८.०८.१९९८ रोजी मयत झालेली आहे. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत पांडुरंग अंबादासराव गोरकर यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्याचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख २३/०१/२०२६

आज दिनांक ०१ माहे जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

**आदेशावरून...**
**अधिक्षक**
**स्वाक्षरित/-** **स्वाक्षरित/-**
**क.लिपीक,** **सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०५१/२०२५**
**विजयप्रकाश पि. किसनलाल भुतडा विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड.एस.पी. येवले, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे जमुनाबाई प्र. किसनलाल भुतडा हे/हया दिनांक १७/०४/२०१६ रोजी मौजे मोंढा रोड गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. खालील प्रमाणे अर्जदार नामे-

१. विजयप्रकाश पि. किसनलाल भुतडा वयः ६६ वर्षे, धंदाः शेती व व्यापार, रा. मोंढा रोड गेवराई ता. गेवराई जि.बीड

२. जयप्रकाश पि. किसनलाला भुतडा, वयः ६४ वर्षे, धंदाः शेती व व्यापार रा. राजस्थानी विदयालय जवळ, विप्रनगर, ब्राम्हणवाडी बीड, ता.जि.बीड

३. ओमप्रकाश पि. किसनलाला भुतडा, वयः ७२ वर्षे, धंदाः शेती व व्यापार रा. प्लॉट नं.५८ खनाळे हॉस्पीटल जवळ स्वतंत्र सैनिक कॉलनी, औरंगाबाद (छ. संभाजी नगर)

४. शिवप्रकाश पि. किसनलाला भुतडा, वयः ६३ वर्षे, धंदाः शेती व व्यापार रा. बेहिंद विंन्दसौर कॅस्टले हॉटेल अवनी अर्पाटमेंट फलॉट नं.४ सी.३/६ टाउन सेंटर सिडको एन.१ औरंगाबाद (छ.संभाजी नगर)

यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाल्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, अर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत जमुनाबाई भ्र. किसनलाल भुतडा हे चे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक. २४/१२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २/०२/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १०६०/२०२५**
**पंचफुला बन्सी तुरूकमारे विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड.के.एल. पिसाळ, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे बन्सी किसन तुरूकमारे हे/हया दिनांक. १२/०६/२०२५ रोजी सावरगांव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. खालील प्रमाणे अर्जदार नामे-

१. पंचफुला भ. बन्सी तुरूकमारे, वयः ७५ वर्षे, धंदाः शेती राः सावरगाव ता. गेवराई जि.बीड

२. अदित्य पि. रामाः तुरूकमारे, वयः २० वर्षे, धंदाः शेती राःसावरगाव ता. गेवराई जि. बीड ह.मु. साठेनगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड

३. प्रज्ञा पि राम तुरूकमारे, वयः २४ वर्षे, धंदाः शेती राःसावरगाव ता. गेवराई जि.बीड

ह.मु. साठेनगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड

४. सत्यशिला भ्र.रामा तुरूकमारे, वयः ४४ वर्षे, धंदाः घरकाम राः सावरगाव ता. गेवराई जि.बीड

यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत बन्सी किसन तुरूकमारे हे चे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १६/१२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०२/०२/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०३२/२०२५**
**लक्ष्मण विश्वनाथ बेदरे व इतर वि. निरंक**
**(मार्फत ॲड. डोईफोडे जी.एस., गेवराई)**

अर्जदार

१. लक्ष्मण पि. विश्वनाथ बेदरे, लय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. बेलगांव ता. गेवराई जि. बीड.

२. सत्यभामा भ्र. रमेश बेदरे, वय ५५ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. बेलगांव ता. गेवराई जि.बीड.

३. अशोक पि. रमेश बेदरे, वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा. बेलगांव, ता. गेवराई जि. बीड.

४. गणेश पि. रमेश बेदरे, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. बेलगांव ता. गेवराई जि. बीड.

ज्याअर्थी मयत विश्वनाथ पि. डेमाजी बेदरे, रा. बेलगांव ता. गेवराई जि. बीड. हे तया दिनांक १७/११/२०२० रोजी रा. बेलगांव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ ते ८ यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर प्रोवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय मदर अर्जदाराच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत विश्वनाथ पि. डेमाजी बेदरे, रा. बेलगांव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २७/१२/२०२० गेजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः- २९/०१/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस. एच. पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०४०/२०२५**
**बळीराम विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड. ए.डी. बांगर गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे प्रविण पि. बळीराम सुळे हे दिनांक १६/०४/२०२४ रोजी रा. मौजे लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार १. बळीराम पि. दाजीबा सुळे वय ५९वर्षे धंदा शेती, रा. लुखामसला, ता. गेवराई जि. बीड २. सुमन पि. बळीराम सुळे वय -५२ वर्षे, धंदा-शेती, रा.लुखामसला ता. गेवराई जि. बीड ३. प्रदिप पि. बळीराम सुळे वय २० वर्षे धंदा शेती, रा.लखाममला, ता. गेवराई यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे

त्यापेक्षा सदर अर्जदार के सदरह मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत प्रविण पि. बळीराम सुळे याचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २६/१२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुएील तारीख ०४/०२/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस. एच. पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०३१/२०२५**
**सुरेखा विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड. सुतार ए.एम. गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे कांताबाई गौतम सुरवसे हे दिनांक २०/१०/२०२५ रोजी संघमित्र नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार १. सुरेखा भ्र. संतोष सुरवसे वय ४३ वर्षे, धंदा मजुरी रा संघमित्रनगर गेवराई ता. गेवराई जि. बीड २. सिध्दार्थ पि. संतोष सुरवसे वय २५ वर्षे, धंदा मजुरी रा संघमित्रनगर गेवराई ता. गेवराई जि बीड, ३. निर्जला पि. संतोष सुरवसे वय २४ वर्षे, धंदा घरकाम, रा संघमित्रनगर राजपिंपरी ता गेवराई राः संघमित्रनगर गेवराई जि बीड. ४.सुजल पि. संतोष सुरवसे वय २१ वर्षे, धंदा मजुरी ता गेवराई जि. बीड यांना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर कांताबाई गौत्तम सुरवसे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/१२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

पुढील तारीख ०४/०२/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०५०/२०२५**
**सुभाष पि. वामनराव गव्हाणे व इतर वि. निरंक**
**(मार्फत ॲड. एस.पी. येवले, गेवराई)**

अर्जदार

१. सुभाष पि. वामनराव गव्हाणे, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड.

२. बालासाहेब पि. वामनराव गव्हाणे, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड.

३. शीला भ्र. प्रल्हादराव थोटे, वय ६० वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. सुर्डी थोट, ता. जि. बीड.

४. प्रमिला भ्र. बापुराव आहेर, सय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. उमरद जहागीर पो. राजुरी ता. जि. बीड.

ज्याअर्थी मयत सागरबाई भ्र. वामन गव्हाणे, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड. है/हया दिनांक १८/०५/२०१६ रोजी रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ ते ४ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत्त त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, कार सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीन पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सागरबाई भ्र. वामन गव्हाणे, रा. टाकळगाव ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल,

आज दिनांक २७/१२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

पुढील तारीख:- ०५/०२/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

पान १ वरून...

**गोरगरिबांच्या अन्नधान्यावर....**

सुरक्षा? हीच का प्रशासनाची जबाबदारी? शटर उघडे - डुकरांना मोकळा रस्ता! गोदामाचे शटर अनेक वेळा उघडेच ठेवले जात असल्याने डुकरं सर्रास आत शिरून अन्नधान्याची नासधूस करत आहेत. शासकीय गोदाम आहे की जनावरांचा तबेला? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. अस्वच्छतेचा कळस - गोदाम परिसर शौचालय बनला! या गोदामाच्या आजूबाजूचा परिसर सार्वजनिक लघुशंका व शौचासाठी वापरला जात आहे, ही बाब अधिकच संतापजनक आहे. घाण, दुर्गंधी आणि अस्वच्छतेच्या विळख्यात अन्नधान्य साठवले जात असून, हेच धान्य गोरगरिबांच्या घरात जाणार आहे, ही बाब अंगावर काटा आणणारी आहे.

सीसीटीव्ही शोभेपुरतेच? गोदामात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत, पण ते खरंच सुरू आहेत का? जर सुरू असतील, तर गोदामपाल तुषार गायके यांना डुकरांचा हा उच्छाद कसा दिसत नाही? की सर्व काही दिसूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे? हे दुर्लक्ष नाही, तर थेट गुन्हा आहे! गोरगरिबांच्या आरोग्याशी उघड उघड खेळ या गोदामातील अन्नधान्य थेट रेशन दुकानांमार्फत गरीब जनतेच्या ताटात जाणार आहे. अशा दूषित, अस्वच्छ आणि जनावरांनी तोंड लावलेल्या धान्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका शंभर टक्के संभवतो.

याला जबाबदार कोण? उद्या एखादी दुर्घटना घडल्यास जबाबदारी कोण घेणार? तात्काळ कठोर कारवाईची जोरदार मागणी या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन जिल्हा पुरवठा अधिकारी, तहसीलदार सुमन मोरे, तालुका पुरवठा अधिकारी विकास राजपूत यांनी गोदामपाल तुषार गायके यांच्यावर शिस्तभंगाची कठोर कारवाई करावी, तसेच नियम पाळणारा, जबाबदार नवीन गोदामपाल तात्काळ नेमावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासन झोपेतच आहे का? गोरगरिबांच्या हक्काच्या अन्नधान्याशी असा उघड उघड खेळ सुरू असताना प्रशासन गप्प का? कारवाईसाठी एखादी मोठी दुर्घटना घडण्याची वाट पाहिली जात आहे का? की या प्रकरणालाही 'सब कुछ मॅनेज' करून दाबले जाणार? हा प्रश्न आता संपूर्ण मंठा तालुक्यात खळबळ उडवून देत आहे.

**शहागडमध्ये घरकुल....**

राठोड यांनी संगनमताने नियम धाब्यावर बसवल्याचा आरोप आहे.
जिओ-टॅगिंग की जिओ घोटाळा
फोटो कुठले आणि घरकुल कुठे* ?

पान १ वरून...

जागेवर घरकुलच नसताना बोगस फोटो, इतर ठिकाणच्या बांधकामांचे फोटो किंवा बनावट जिओ-टॅगिंग करून अहवाल तयार करण्यात आले का ? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.गरिबांच्या घराचे पैसे अधिकाऱ्यांच्या खिशात गेले कसे ? हा प्रश्न आता शहागडच्या प्रत्येक नागरिकाच्या ओठांवर आहे.जागेवर पंचनामा करा अन्यथा रस्त्यावर उतरूया गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन गट विकास अधिकारी (इऊज) यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून पंचनामा करावा अशी ठाम मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.तक्रारदार संभाजी अडगळे यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की प्रशासन जर भ्रष्ट अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असेल तर लोकशाही मार्गाने लढा अटळ आहे.येत्या गुरुवारी १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७:३० वाजल्यापासून शहागड ग्रामपंचायतीसमोर मी आमरण उपोषणाला बसणार आहे. प्रशासनाची कसोटी;चौकशी होणार की झाकपाक?आता या संपूर्ण प्रकरणाचा चेंडू पंचायत समिती अंबड प्रशासनाच्या कोर्टात आहे.या कागदोपत्री घरकुल घोटाळ्याची निष्पक्ष आणि कठोर चौकशी होणार की दोषींना अभय दिले जाणार ? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**राष्ट्रीय खो-खो ....**

उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमॅच्युअर खो-खो संघटनेचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खो-खो मार्गदर्शक तथा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते प्रा. जे. पी. शेळके, एमॅच्युअर खो-खो संघटनेचे सचिव विजय जाहेर, सहसचिव मनोज जोगदंड, कोषाध्यक्ष योगेश सोळसे, तसेच अनिल शेळके, समाधान सोनवणे, शाळेचे मुख्याध्यापक आर. टी. राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.या प्रशिक्षण शिबिरात नुकत्याच पार पडलेल्या ६२ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेतून निवड झालेले पुरुष व महिला गटातील प्रत्येकी १५ खेळाडू सहभागी झाले असून उद्घाटनप्रसंगी सर्व खेळाडू मॅटवर उपस्थित होते.दिनांक १ जानेवारी २०२६ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीत हे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले असून दररोज सकाळी ७.०० ते १०.०० आणि दुपारी ३.३० ते सायंकाळी ६.०० या वेळेत नियमित सराव सत्रे घेतली जाणार आहेत.या शिबिरात सहाय्यक प्रशिक्षक अजित शिंदे, डॉ. नरेंद्र कुंदर, नरेंद्र मेगळ, कु. निकिता पवार, प्रफुल्ल हाटवटे, सुनिता जायभाय हे प्रशिक्षक खेळाडूंना मॅटवर तांत्रिक, शारीरिक व कौशल्य विकासाचे मार्गदर्शन करीत आहेत.



# येडेश्वरी फाऊंडेशनच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी व्यवसाय उभारणीस बळ

केज/प्रतिनिधी

खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली येडेश्वरी फाउंडेशन,केज यांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम प्रभावी ठरत असून,शेकडोमहिला आज स्वतःचा व्यवसाय उभा करत आहेत. आर्थिक,सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या महिलांचे सक्षमीकरण व्हावे,त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहाव्यात,या उद्दिष्टाने येडेश्वरी फाउंडेशन तर्फे महिला सक्षमीकरण केंद्र सुरू करण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या येडेश्वरी फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांना शिवणकाम, अरीवर्क कला,बेकरी प्रॉडक्ट्स,कॉम्प्युटर कोर्स आदी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जात आहे. येडेश्वरी कार्यालयात सुरू असलेल्या या प्रशिक्षणा तून महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून स्वतःचे व्यवसाय सुरू केले असून,अनेक कुटुंबांना याचा थेट लाभ होत आहे.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.३ जानेवारी रोजी येडेश्वरी फाउंडेशनच्या सौजन्याने लव्हुरी येथे रूपालीताई शिनगारे यांच्या राजवीर एंटरप्राईजेस व जनरल स्टोअर्स या व्यवसायाचे उद्घाटन येडेश्वरी फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ.शितलताई लांडगे यांच्या हस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सतीश पाटेकर यांनी केले तर प्रास्ताविक सरस्वती शिनगारे यांनी मांडली.प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच विजय दादा चाळक,भाई दादा चाळक,छत्रभुज चाळक, दीपिका पाटेकर यांच्या सह गावातील मान्यवर व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

येडेश्वरी फाउंडेशनच्या सहकार्याने गोरगरीब महिलांचे व्यवसाय उभे राहत असून,या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. महिलांच्या स्वावलंबना साठी राबविण्यात येणारे हे प्रयत्न प्रेरणादायी ठरत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

# कामगार क्षेत्राला नव्या उंचीवर घेऊन जाण्यात गुणवंत कामगारांचा मोठा वाटा - अध्यक्ष स.सो. खंडाळकर

## छत्रपती संभाजी नगर येथे गुणवंत कामगारांचा स्नेह मिलन सोहळा रंगतदार रंगला







छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

विद्याभाऊ सदावर्ते यांच्यापासून मराठवाड्यात गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार मिळण्यास झालेली सुरुवात मराठवाड्यातील कुशल कामगारांनी गुणवत्ता व चिकाटीच्या जोरावर जोमाने वाढवली. गुणवंत कामगार पुरस्कार मिळाल्यानंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून उद्योग आणि कामगार क्षेत्राला नव्या उंचीवर घेऊन जाण्यात गुणवंत कामगारांचा मोठा वाटा आहे असे मत संस्थेचे अध्यक्ष स.सो. खंडाळकर यांनी व्यक्त केले.

मराठवाडा गुणवंत कामगार विकास संस्थेच्या त्रिदशकपूर्ती निमित्त आयोजित गुणवंत कामगारांच्या स्नेहमिलन सोहळ्यास उपस्थित गुणवंतांनी नव्या जुन्या आठवणीत रमत आपल्या कलागुणांना उजाळा देऊन सर्वांना मंत्रमुग्ध करत स्नेह मिलन सोहळा साजरा केला. कार्यक्रमास पो.नि.अतुल येरमे, राजू धोत्रे (स. संचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई), त्रिदेवता मंदिराचे विश्वस्त विश्वनाथ स्वामी,संस्थेचे अध्यक्ष स.सो. खंडाळकर,सामाजिक कार्यकर्ते राहुल मोरे, पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी सह विविध शासकीय पुरस्कार प्राप्त गुणवंतांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

मराठवाडा गुणवंत कामगार विकास संस्थेचे ज्ञानेश्वर आप्पा खर्डे, गुलाबराव मगर,सुभाष देवकर यांच्यासह सर्व गुणवंत कामगारांच्या उपस्थितीने जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यमान पदाधिकाऱ्यांच्या परिश्रमाने मराठवाड्यातील गुणवंत कामगारांचा स्नेह मिलन सोहळा संपन्न झाला.या कार्यक्रमाचे प्रस्तावित संस्थेचे सचिव मुकुंद कोकणे यांनी केले.

उद्योग व कामगार क्षेत्रात सोबतच विविध क्षेत्रात चमकदार कामगिरी करणाऱ्या उपस्थित गुणवंतांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. गुणवंत कामगार पुरस्कार मिळाल्यानंतर पत्रकारितेचे शिक्षण पूर्ण करून महाराष्ट्र शासनाच्या सेवेत स. संचालकपदी कार्यरत असलेले राजू धोत्रे साहेब यांची सोहळ्यास विशेष उपस्थिती होती. संस्थेच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.सोहळ्यास उपस्थित गुणवंत कामगार हे आपल्या बांधवांप्रमाणे एकमेकांची अस्थेवाईकपणे चौकशी करून आलिंगन देत जुन्या आठवणीत रमून गेल्याचे दिसून आले. कर्तव्य बजावत असलेले व सेवानिवृत्त गुणवंत कामगार यांच्यासह कुटुंबीयांनी सोहळ्यात आपल्यातील कला गुणांचे सादरीकरण केले. जी ए बारस्कर यांनी व्यंगचित्राद्वारे चालू घडामोडींवर प्रकाश टाकला, शाहीर भीमसिंह शिरे यांनी भांबर्डे महाराज, अरविंद अवचरमल यांच्या साथीने आपल्या गायनातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला, निर्मला बडवे यांनी आपल्या सुरेल गायनातून सर्वांना मंत्रमुग्ध केले.तर कल्पना अजमेरा यांच्या सावित्रीबाई फुले यांचे आत्मकथन उपस्थितांच्या अंतर्मनाला भावूक करून गेले. शहाजी भोसले यांनी अंधश्रद्धा निर्मूलन वर प्रयोग सादर केला. शाहीर लक्ष्मण मोकासरे यांनी पोवाडा सादर केला.मकर संक्रांतीच्या शुभमुहूर्तावर सर्व महिला गुणवंत तसेच गुणवंत कामगारांच्या पत्नींना साडी भेट देऊन सामाजिक जिव्हाळा जपण्याचा स्तुत्य उपक्रम झाला.माऊली फायबर इंडस्ट्रीजच्या मुंबरे दांपत्याने विठ्ठल रुक्मिणीची कमरेवर हात असलेली विशेष मूर्ती सर्व गुणवंतांना भेट दिल्या. मुंबरे दांपत्याच्या कुशलतेस उपस्थितांनी टाळ्याच्या गजरात अभिवादन केले. .

गुणवंत कामगार पुरस्कार मिळाल्यानंतर न थांबता पुढे यशस्वी वाटचाल करणारे महेश शेवलीकर, श्रीनिवास कळमकर, साहेबराव कांडेकर, राजकुमार मुंबरे,दत्ता महाडिक यांनी प्रधानमंत्री श्रम पुरस्कार प्राप्त आहेत. तर उत्तम आजबे प्रधानमंत्री श्रमविर सह महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त आहेत. झुंबरराव खराडे हे आपल्या व्यसनमुक्ती प्रचार कार्याला नव्या संकल्पनेने पुढे नेत महाराष्ट्रभर विविध कारखान्यांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश देतात. त्यांना महाराष्ट्र शासनाकडून राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार मिळालेला आहे. तसेच शोभा दांडगे यांनी अभिनय क्षेत्रात यशस्वी संपादन केली आहे. दूरचित्रवाणीवर मालिका व चित्रपटांमध्ये त्यांच्या भूमिका यशस्वी होत आहेत.

# महामार्ग रुंदीकरणासाठी आ.सुरेश धस यांचा आदर्श

## माझ्या निवासस्थानासमोरचे अगोदर काढा आ.धस यांनी प्रशासनाला केली विनंती



आष्टी (राजेंद्र लाड)

बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५६१ हा आष्टी शहरातून जात असून या महामार्गाचे रुंदीकरणाचे काम शासनाच्या निर्णयानुसार सुरू आहे. आष्टी शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या रस्ता रुंदीकरणासाठी महामार्गालगत असलेले नियमबाह्य पत्र्याचे शेड, कुंपणे व अडथळे स्वेच्छेने काढून घेण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर मराठवाडा भूषण आमदार सुरेश धस यांनी लोकप्रतिनिधी म्हणून केवळ आवाहन न करता प्रत्यक्ष कृतीतून आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या स्वतःच्या घरासमोरील महामार्गाच्या रुंदीकरणात येणारी 'मियावाकी' पद्धतीची वृक्ष लागवड काढून घेण्यासाठी त्यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत सांगितले की, माझी वृक्ष लागवड अगोदर काढा, म्हणजे इतर नागरिकांना व व्यावसायिकांना वेगळा व सकारात्मक संदेश जाईल. आमदार धस यांच्या या भूमिकेमुळे प्रशासनाने त्यांच्या घरासमोरील वृक्ष लागवड हटवण्याची कार्यवाही प्रथम सुरू केली. वैयक्तिक पातळीवर केलेली ही वृक्ष लागवड पर्यावरणपूरक असली, तरी शहराच्या दीर्घकालीन विकासासाठी रस्ता रुंदीकरण अधिक आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी कोणताही विरोध न करता सहकार्याची भूमिका घेतली. शासन निर्णयानुसार आष्टी शहराच्या हद्दीबाहेरील रस्त्याची रुंदी व शहरातील हद्दीतील रुंदीकरण वेगवेगळ्या निकषांनुसार करण्यात येणार असून, त्या अनुषंगाने रस्ता रुंदीकरणाच्या कामात अडथळा ठरणारे पत्र्याचे शेड, बांधकामे व वृक्ष लागवड हटवण्याची मोहीम सुरू आहे. आमदार धस यांनी स्वतः पुढाकार घेतल्यामुळे अनेक नागरिक व व्यावसायिकांनीही आपल्या घरासमोरील अडथळे स्वेच्छेने काढून घेण्यास सुरुवात केली आहे. लोकप्रतिनिधी म्हणून प्रथम स्वतः त्याग करून नंतर नागरिकांकडून सहकार्याची अपेक्षा ठेवण्याचा हा आदर्श आ. सुरेश धस यांनी घालून दिला असून, आष्टी शहराच्या विकासासाठी लोकसहभागातून मोठे परिवर्तन शक्य आहे, हा विश्वास त्यांनी आपल्या कृतीतून पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

# अलहुदा उर्दू हायस्कूल बीडची नळदुर्ग किल्ल्यावर शैक्षणिक सहल संपन्न



इतिहास प्रत्यक्ष अनुभवातून उलगडला

बीड ।प्रतिनिधी

शहरातील नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटीद्वारा संचलित अलहुदा उर्दू हायस्कूल, बीड येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासाच्या उद्देशाने यावर्षीही शैक्षणिक सहलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच इतिहास व सांस्कृतिक पुरातन वारशाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची सुवर्णसंधी मिळाली. शाळेतील इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची एकदिवसीय शैक्षणिक सहल ऐतिहासिक नळदुर्ग किल्ला, तालुका तुळजापूर, जिल्हा धाराशिव (उस्मानाबाद) येथे पार पडली. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी किल्ल्याची भव्य तटबंदी, दरवाजे, बुरुज, जलव्यवस्था व संरचनात्मक वैशिष्ट्यांची बारकाईने पाहणी केली. तसेच नळदुर्ग किल्ल्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीविषयी, त्याच्या संरक्षणात्मक महत्त्वाविषयी आणि तत्कालीन राजकीय-सामाजिक परिस्थितीविषयी माहिती जाणून घेतली.

या शैक्षणिक सहलीचे प्रमुख सहशिक्षक सय्यद रहबर यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने सहलीचे आयोजन करून सर्व जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पाडल्या. सहलीदरम्यान मुख्याध्यापक डॉ. पठाण सिराज खान, सहशिक्षक मोहम्मद रफीक व सहशिक्षक शेख मोइजुद्दीन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत इतिहासाचे महत्त्व, वारसा जतनाची गरज तसेच शिस्त व संघभावनेचे धडे दिले.

सहलीच्या पूर्वतयारीपासून प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत शिक्षकेत्तर कर्मचारी शेख रफीक, शेख मसूद, युनुस खान आदींनी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी सहलीचा आनंद घेताना उत्साह, शिस्त व जिज्ञासू वृत्तीचे उत्तम दर्शन घडवले.या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबाबतची आवड वाढली असून प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाल्याने हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरल्याचे मत पालक व शिक्षकांनी व्यक्त केले.



# सुलेखन स्पर्धेत चिंचोली शाळेचे शिक्षक नवनाथ जिरेकर यांची राज्यस्तरावर घवघवीत निवड

आष्टी (राजेंद्र लाड)

शिक्षकांच्या अध्यापन कौशल्यात भर घालणे तसेच त्यांच्या भाषिक, लेखन व सादरीकरण क्षमतेला चालना देण्याच्या उद्देशाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) महाराष्ट्र यांच्या वतीने राज्यभरात ४३ विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. याच उपक्रमांतर्गत परभणी येथे पार पडलेल्या विभागीय सुलेखन स्पर्धेत पाटोदा तालुक्यातील चिंचोली नाथ येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक नवनाथ जिरेकर यांनी उल्लेखनीय यश संपादन करत राज्यस्तरासाठी निवड मिळवली आहे.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर विभागासाठी विभागस्तरीय स्पर्धा परभणी येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी व हिंगोली या पाच जिल्ह्यांतील एकूण ४६ शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता. उत्कृष्ट व सुबक लेखनशैलीच्या जोरावर नवनाथ जिरेकर सर यांनी परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.

राज्यस्तरीय सुलेखन स्पर्धा येत्या काळात सिंधुदुर्ग येथे आयोजित करण्यात येणार आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० व राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ यांच्या अनुषंगाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृद्धीस चालना देणे, त्यांच्यातील सर्जनशीलता विकसित करणे तसेच सहकार्य व स्पर्धात्मकतेची सकारात्मक भावना निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

राज्यस्तरासाठी निवड झाल्याबद्दल पाटोदा तालुका गटशिक्षणाधिकारी श्री. धनंजय बोंदार्डे यांनी नवनाथ जिरेकर सर यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे चिंचोली नाथ जिल्हा परिषद शाळेसह संपूर्ण पाटोदा तालुक्याचा शैक्षणिक नावलौकिक वाढला असून, शिक्षक व विद्यार्थी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## तलवाड्यातील इरा मॉडेल इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची




# गेवराई राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनास भेट - प्राचार्या मोरे मनीषा

गेवराई ।प्रतिनिधी

कै. ची. ओमकार प्रतिष्ठान राहेरी संचलित इरा मॉडेल इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज तलवाडा मधील विद्यार्थ्यांनी गेवराई येथील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनास भेट दिली.सदरील भेटीमध्ये विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण कृषी क्षेत्रातील अवजारे, नवीन तंत्रज्ञान,नवीन पिकांची विविध जाती,विविध प्रकारचे शेती संदर्भातील औषधे, प्रत्येक स्टॉल यांनी विद्यार्थ्यांसह प्राचार्य, शिक्षक यांना अनमोल मार्गदर्शन केले. सदरील एक दिवसीय शैक्षणिक सहलीचे नियोजन व मार्गदर्शन संस्थेचे सचिव शिवाजीराव फलके यांनी केले. त्याचबरोबर शाळेच्या प्राचार्या मोरे मनीषा,कालिका मिस,कोमल गवते मिस,योगिता जऱ्हाड मिस, नाझिया मिस,बुशेरा मिस,बापू पिंपळे,विजय पहाड,बापू फलके इत्यादीनी सहकार्य केले. त्यानंतर प्राचार्या मोरे मनीषा यांनी असे सांगितले की खरोखर असे कृषी प्रदर्शनातून शेतकरी वर्ग आणि विद्यार्थी ना उपयुक्त ठरत आहे. कारण आजचे विद्यार्थी उद्याचे या देशाचे आधार स्तंभ आहेत.

# अंबडमध्ये सडक सुरक्षा जीवन रक्षा अभियानाला उस्फूर्त प्रतिसाद

## हेल्मेट जनजागृती रॅलीतून रस्ता सुरक्षा नियम पाळण्याचा ठाम संदेश




अंबड (प्रतिनिधी)

रस्ते अपघात रोखणे आणि प्रत्येक नागरिकाचे मौल्यवान जीवन सुरक्षित ठेवणे ही काळाची गरज आहे हा ठाम संदेश देत प्रादेशिक परिवहन कार्यालय जालना यांच्या वतीने दि.३ जानेवारी २०२६ रोजी अंबड येथे सडक सुरक्षा जीवन रक्षा रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत भव्य हेल्मेट जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.या रॅलीला नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी व विविध संस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षा नियमांविषयी जागृती निर्माण करणे अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि जबाबदार वाहनचालक घडवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मा.चंद्रमोहन कृष्णा चिंतल यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.अंबड उपविभागीय पोलीस अधिकारी मा. डॉ. सिद्धेश्वर धुमाळ,पोलीस निरीक्षक श्री. संतोष घोडके,जिल्हा वाहतूक शाखाप्रमुख श्री.चंद्रकांत चापुरे,नगरपरिषद अंबडचे मुख्याधिकारी मा.मनोज उर्कीडे

आणि मोटार वाहन निरीक्षक श्री. भीमराज नागरे या मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून या जनजागृती रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. नियम पाळा, जीव वाचवा रॅलीतून प्रभावी संदेश रॅलीदरम्यान नागरिकांपर्यंत विविध संदेश फलक व घोषणांच्या माध्यमातून पोहोचविण्यात आले त्यामध्येअति वेगाने वाहन चालवू नका दारूच्या नशेत वाहन चालवू नका वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळाप हेल्मेटचा वापर अनिवार्य करा समोरील वाहनांपासून सुरक्षित अंतर ठेवा वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळा असे महत्त्वाचे आणि जीवनरक्षक संदेश देण्यात आले. शहरातून फिरली जनजागृतीची साखळी ही हेल्मेट जनजागृती रॅली छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून सुरू होऊन मत्स्योदरी देवी मंदिर, महावीर चौक,महाराष्ट्र द्वार, पोलीस ठाणे,पाचोरा रोड मार्गे तहसील कार्यालय,अंबड येथे समारोप झाली.विविध घटकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग या अभियानात पोउपनि.छोटूराम टुबे,पोउपनि.रंजना बांगलानी, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक शुभम मोटे,राजकुमार मुंढे, ऋषिकेश कुमावत,इरफान खान, जिल्हा वाहतूक शाखा जालना तसेच विविध मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अष्टविनायक,न्यू समर्थ,जगदंब, श्री माऊली,जयंत,देवा मोटर ड्रायव्हिंग स्कूल यांच्यासह वाहनचालक,विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रस्ता सुरक्षेचा संदेश प्रभावीपणे दिला. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन कटिबद्ध या अभियानामुळे अंबड शहरात रस्ता सुरक्षा नियमांविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून रस्ता सुरक्षा ही केवळ नियमांची बाब नसून ती प्रत्येकाच्या जीवाची हमी आहे हा संदेश नागरिकांच्या मनात ठसवण्यात आला. प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि नागरिक एकत्र आल्यास अपघातमुक्त अंबड घडवणे निश्चितच शक्य आहे असा विश्वास या रॅलीतून व्यक्त करण्यात आला.




# ७४ विध्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन

महामानव अभिवादन ग्रुपचा उपक्रम

बीड /प्रतिनिधी

अनिष्ठ रूढी, परंपरे नुसार वंचित, शूद्र, अतिशूद्र व समस्त स्त्रीयांना शिक्षणा पासून दूर ठेवणाऱ्या रूढी परंपरा झूगारून क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुलेंच्या खांदयाला खांदा लावून स्त्री शिक्षणासाठी अंगावर शेण झेलणाऱ्या व कितीही विरोध झाला तरी आपल्या ठरविलेल्या ध्येयापूर्ती करिता न डागमगणाऱ्या भारताच्या प्रथम शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीदिनी जि.प केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा अशोक नगर बीड येथे ७४ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही-पेन) वाटप करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी मुख्याध्यापक सुनील कुर्लेकर सर तर प्रमुख पाहुणे म्हणून महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम भोले व पत्रकार युवराज सोनवणे लाभले होते. ड. तेजस वडमारे, मुख्याध्यापक वैशाली शिंदे - उजगरे व डी.जी वानखेडे यांची विचार मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसूर्य ज्योतिबा फुले,क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्प दीप धूपाने मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री विठ्ठल जायभाये यांनी तर प्रास्ताविक आयु. जी.एम भोले यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात महामानव अभिवादन ग्रुप राबवित असलेल्या विविध समाज उपयोगी कार्यक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली. सर्व महापुरुषांच्या कार्याला उजाळा देणे व त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे कसे गरजेचे आहे हे सांगितले. आयु. श्रीमती वैशाली शिंदे -उजगरे यांनी सावित्रीमाईने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्त्रियांच्या शिक्षणाकरता घेतलेले अपार कष्टाबद्दल सविस्तर माहिती दिली. अनिष्ट रूढी परंपरा झूगारून शिक्षण घेऊन जीवनातील अज्ञानरूपी अंधार दूर करणे कसे गरजेचे आहे हे समजावून सांगितले. अध्यक्षीय समारोपात श्री सुनील कुर्लेकर सरांनी सावित्रीमाई व पुष्प दीप धुपाने पूजन केलेल्या सर्वच महापुरुषांच्या जीवनाचा अभ्यास करून त्यांनी सर्वांच्या व देशाच्या हिताकरिता केलेल्या कार्यावर सखोल प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे पक्के मनावर रुजवावे व शरीर स्वास्थ्य सांभाळून भारताचे सुजाण नागरिक बनावे असे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले.आजच्या सावित्रीच्या लेकींनी सावित्रीमाईंच्या वेशभूषेत सावित्रीमाईने स्त्री शिक्षणा करिता केलेल्या महान कार्याबद्दल मनोगत व्यक्त केले. त्या ३ विद्यार्थिनींना वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालय तर्फे सावित्रीमाई फुले, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र पुस्तके भेट देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वाचाल तर वाचालचे अध्यक्ष आयु.डी.जी वानखेडे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास डॉ.सखाराम शिंदे, शिक्षिका श्रीमती कदम एच.डी, श्रीमती उषा सोनवणे, श्रीमती माया तेलंग,श्रीमती मनीषा काकडे,श्रीमती संगीता वाघमारे व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. संबोधी प्रतिष्ठानच्या वैशाली शिंदे उजगरे यांनी विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# व्हिजन अकॅडमीच्या भव्य करिअर मार्गदर्शन शिबिर व बक्षीस वितरण सोहळ्याने विद्यार्थ्यांच्या भविष्यास दिली नवी दिशा

## शिक्षकांनी सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविण्यावर भर द्यावा - मा.आ.भीमराव धोंडे

आष्टी (राजेंद्र लाड)

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, बौद्धिक व व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देत त्यांना योग्य करिअरची दिशा मिळावी, या उदात्त हेतूने व्हिजन अकॅडमी, आष्टी यांच्या वतीने परीक्षेला जाता - जाता करिअर मार्गदर्शन तसेच दहावीनंतर काय? या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन शिबिर आणि व्हीएसएटी व ॲडमिशन कम स्कॉलरशिप टेस्टचा भव्य बक्षीस वितरण सोहळा दि. ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वा. धोंडे कॉम्प्लेक्स, आष्टी येथे अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आ. भीमराव धोंडे हे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली. व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. दिलीप देशमुख, मार्गदर्शक प्रा. विष्णु घुगे, मा. शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे, व्हिजन अकॅडमीचे संस्थापक व संचालक धीरज शिंदे, शाखा व्यवस्थापक तुषार दराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार तथा उपसंपादक उत्तम बोडखे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, राजेंद्र धोंडे, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासन अधिकारी शिवदास




विधाते, माऊली बोडखे, इंजि. पी. बी. बोडखे, बा. म. पवार, संतोष दाणी, अशोक धोंडे, प्रकाश सातपुते, राजेंद्र लाड, रविंद्र हुमे, धर्मराज शिंदे, सौ. मंगल शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांची संख्या व विविध क्षेत्रांतील प्रतिनिधित्व पाहता हा कार्यक्रम केवळ शैक्षणिक न राहता सामाजिक स्तरावरही महत्त्वपूर्ण ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर व्हिजन अकॅडमीच्या वतीने अध्यक्ष, प्रमुख मार्गदर्शक व सर्व मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. याचवेळी व्हिजन अकॅडमीच्या उपक्रमात मोलाचे योगदान देणारे धीरज शिंदे, तुषार दराडे, धर्मराज शिंदे, सौ. मंगल शिंदे यांच्यासह सुरेश घुगे, विनोद दराडे, भानुदास चव्हाण, शेख समीर, उमेश घुगे, आदित्य धोंडे यांचा मा. आ. भीमराव धोंडे यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात व्हिजन अकॅडमीचे संचालक धीरज शिंदे यांनी संस्थेची भूमिका, उद्दिष्टे व कार्यपद्धती यांची सविस्तर माहिती दिली. ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन आणि आर्थिक मदतीच्या संधी उपलब्ध करून देणे, हा व्हिजन अकॅडमीचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. यावर्षी घेण्यात आलेल्या व्हीएसएटी परीक्षेसाठी सुमारे पाच हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असून त्यापैकी तब्बल तीन हजार विद्यार्थी बक्षीसपात्र ठरले आहेत, ही बाब विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची साक्ष देणारी असल्याचे त्यांनी सांगितले. उपस्थित सर्व विद्यार्थी व पालकांचे त्यांनी मनःपूर्वक स्वागत केले.

प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. दिलीप देशमुख यांनी आपल्या प्रेरणादायी व अनुभवसमृद्ध भाषणात विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी सांगितले की, युवकांमध्ये असलेली ऊर्जा आणि कल्पकता ही देशाची खरी ताकद आहे. योग्य मार्गदर्शन, सकारात्मक वातावरण आणि समाजाचा विश्वास मिळाल्यास युवक कोणतेही ध्येय गाठू शकतात. देशासाठी काहीतरी करण्याची भावना विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाली पाहिजे, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, सातत्य आणि प्रामाणिक प्रयत्नांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या भाषणाने विद्यार्थ्यांमध्ये नवी उमेद आणि उत्साह निर्माण झाला.

मार्गदर्शक प्रा. विष्णु घुगे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते, काही जण शैक्षणिक क्षेत्रात उजवे ठरतात, तर काही क्रीडा, संगीत, कला, तंत्रज्ञान किंवा इतर कौशल्याधारित क्षेत्रांत प्राविण्य मिळवतात. शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांची तुलना न करता त्यांच्या अंगभूत गुणांची ओळख करून द्यावी व त्यानुसार करिअरची दिशा ठरवावी, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

---

## महाराष्ट्र राज्य विमुक्त घुंमतू जनजाती महासंघाच्या कार्यकारी प्रदेशाध्यक्षपदी डॉ.लक्ष्मण जाधव यांची निवड



बीड ।प्रतिनिधी

गेल्या २५ वर्षांपासून ओबीसी, भटक्या -विमुक्त जाती जमातीच्या उत्थानासाठी अविरतपणे कार्यरत असलेले डॉ.लक्ष्मण जाधव यांची महाराष्ट्र राज्य विमुक्त घुंमतू जनजाती महासंघाच्या कार्यकारी प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे, याबाबत राष्ट्रीय अध्यक्ष श्री.राजीव कुमार (दिल्ली) यांनी नियुक्ती पत्रक देऊन अभिनंदन करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

गेल्या अडीच दशकापासून सामाजिक, राजकीय, वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन डॉ.लक्ष्मण जाधव ही निवड करण्यात आली आहे.या निवडी बाबत त्यांची सर्वच क्षेत्रातील अनेकांनी अभिनंदन करुन शुभेच्छा देऊन निवडी बद्दल आनंद व्यक्त केला आहे.

---

## देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणजे व्यापारी पक्ष :- हस्तिमल बंब



(तळणी वार्ताहर) - व्यापाऱ्यांत सर्व समाजाचे लोक आहेत, सर्व जाती-पाती आणि सर्व धर्मांतील लोक आमच्या सोबत आहेत. आम्हाला समर्थन पण आहे. त्यामुळे मी म्हणतो देशात जर सर्वात मोठा पक्ष कोणता असेल, तर तो 'व्यापारी पक्ष' आहे, अशा शब्दांत व्यापारी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष हस्तिमल बंब यांनी व्यापाऱ्यांची एकजूट अधोरेखित केली.

स्वदेशी वस्तूंना प्राधान्य व महिलांना व्यवसायात सहभागी करून घ्यावेपंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रामीण भागातील लहान-मोठ्या व्यापाऱ्यांनी स्वदेशी वस्तूंच्या खरेदी-विक्रीला प्राधान्य द्यावे, तसेच विविध क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय कामगिरी केली असून देशाच्या सर्वोच्च पदावर देखील महिला राष्ट्रपती कार्यरत आहेत; त्यामुळे महिलांना व्यवसायात सहभागी करून त्यांना पुढे आणणे ही काळाची गरज असल्याचे बंब यांनी नमूद केले.मंठा तालुक्यातील तळणी येथे (ता.४ ) जानेवारी रोजी आयोजित व्यापारी महासंघाच्या बैठकीत ते मार्गदर्शन करीत होते. ग्रामीण व्यापाऱ्यांच्या अडचणी, प्रलंबित प्रश्न, संघटनेची पुढील दिशा आणि पदाधिकारी निवड या मुद्द्यांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

यावेळी बंब म्हणाले, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी 'व्यापारी निरोगी अभियान' प्रभावीपणे राबवावे. तळणी ग्रामपंचायतीने व्यापारी

### तळणीत व्यापारी महासंघाची बैठक संपन्न

गाळ्यांसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून दिल्यास व्यापारी संकुल उभारण्याचा उपक्रम हाती घेता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमास व्यापारी महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष हस्तिमल बंब, ऑर्बिट डिजिटलचे मकरंद शहापूरकर, महिला जिल्हाध्यक्षा सौ. प्रिया जोशी, जिल्हा कार्यकारिणी सदस्य प्रमोद जोशी, केशवराव सरकटे, सरपंच गौतम सदावर्ते, ,व बबनराव सरकटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तळणी व्यापारी महासंघाच्या अध्यक्षपदी सचिन सरकटे

तर कोषाध्यक्षपदी दिलीप भंडारी यांची निवड

तळणी व्यापारी महासंघाच्या बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी सचिन सरकटे, तर कोषाध्यक्षपदी दिलीप भंडारी यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी हनुमान चंदेल आणि सचिवपदी जनार्धन आढळकर यांची निवड करण्यात आली.यावेळी ग्रा.प.सदस्य सुधाकर सरकटे,रितेश चंदेल,इब्राहिम शेख ,प्रा. एकनाथ पवार, संदीप पाटील, सत्तार बागवान, स्वप्नील सरकटे,नारायण सरकटे,भागवत गुजर, गोपाल सोनुने यांच्यासह व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## बोरगाव जिल्हा परिषद शाळेत सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरा

### विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा करून वेधले लक्ष

जाफराबाद ।हरी भालके

जाफराबाद तालुक्यातील बोरगाव बु येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बालिकादिन साजरा करण्यात आला .यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले..शाळेतील मुलींनी साकारलेल्या सावित्रीबाईंच्या वेशभूषेने लक्ष वेधून मनोगत व्यक्त केले.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांतर्फे बालसभेचेआयोजन करण्यात आले होते

कु. तन्वी फदाट हिने सूत्रसंचालन,प्रास्ताविक शिवानी फदाट तर आभार प्रदर्शन तेजल गंगात्रे हिने केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इयत्ता सहावीचा विद्यार्थी रुद्राक्ष खंदाडे हा होता.प्रमुख पाहुणे म्हणून कुमारी अयोध्या फदाट, सनम शहा, भाग्यश्री चव्हाण,कोमल जोशी,शोहेब शेख,शहीद पठाण, इत्यादी विद्यार्थी होते त्याचप्रमाणे शाळेतील अनेक विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंच्या जीवनकार्यावर भाषेने केली कुमारी ऋतुजा फदाट व भाविका फदाट यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर सुंदर गीत सादर केले या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे कुमारी पूर्वी अनिल फदाट हिने सावित्रीच्या वेशभूषेत मी सावित्री बोलते ही व्यक्तिरेखा सादर केली या व्यक्तिरेखेस प्रतिसाद देत शिक्षकांनी व गावकऱ्यांनी बक्षीसही दिले तर परी जाधव,आरुषी फदाट,ऋतुजा जाधव,विशाखा फदाट,आरुषी




फदाट,कल्याणी पवार, वेदिका फदाट,संतोषी फदाट,नैना खंदारे,पूर्वी फदाट,श्रावणी फदाट,शिवकन्या जाधव,हर्षदा चव्हाण,समृद्धी फदाट,राजश्री खंदारे,दिव्या जाधव या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारली होती.

कार्यक्रमानंतर इयत्ता आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी इतर सर्व वर्गांना अध्यापनाचे कार्य करून अध्यापनाचा मोठा अनुभव घेतला व स्वयंशासन दिन उत्साहात पार पाडला. शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून कुमारी दिव्या सुभाष खंदाडे व उपमुख्याध्यापिका म्हणून सृष्टी समाधान माकोडे यांनी काम पाहिले.

याप्रसंगी केंद्रप्रमुख व शाळेचे मुख्याध्यापक श्री बी एल देशमुख गोपालसिंग बेडवाल, संजय निकम,राजेंद्र सोनवणे, राजेंद्र भुजबळ,प्रल्हाद काळे,श्री,शेवाळे सर, श्री गायकवाड सर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री सुभाष फदाट यांच्यासह गावकरी मंडळी उपस्थित होते.

---

# गुणवंत कामगारांमुळेच उद्योग क्षेत्राची नेत्रदीपक प्रगती शक्य - वैभव स्वामी

## छत्रपती संभाजीनगर येथे गुणवंत कामगारांचा दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने गुणगौरव

छत्रपती संभाजीनगर / पी.एस. गुजर

उद्योग क्षेत्रामध्ये गुणवंत कामगारांची संख्या वाढावी यासाठी शासनाने गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार सुरू केले.मराठवाड्यामध्ये सदावर्ते यांच्यापासून गुणवंत कामगार पुरस्काराचा सुरू झालेला सन्मान प्रत्येक वर्षी वाढत आहे ही बाब अभिमानास्पद आहे. मागास मराठवाड्याचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर उद्योग क्षेत्रा शिवाय पर्याय नाही आणि मराठवाड्यात गुणवंत कामगारांशिवाय ते शक्य नाही यावर्षीपासून दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने प्रतिवर्षी प्रातिनिधिक स्वरूपात गुणवंत कामगारांचा सन्मान करणार असल्याचे प्रतिपादन संपादक वैभव स्वामी यांनी जाहीर केले.

छत्रपती संभाजी नगर येथील सिडको एन ७ परिसरातील त्रिदेवता मंदिर सभागृहात मराठवाडा गुणवंत कामगार विकास संस्थेच्या त्रिदशक पूर्ती निमित्त गुणवंत कामगारांचा स्नेहमिलन सोहळा शुक्रवार दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष स.सो. खंडाळकर यांच्यासह पोलीस निरीक्षक अतुल येरमे,सहाय्यक संचालक माहिती



व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई येथील राजू धोत्रे, त्रिदेवता मंदिराचे विश्वस्त विश्वनाथ स्वामी, सामाजिक कार्यकर्ते राहुल मोरे,दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी,पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाप्रमुख छबुराव ताके आदींचे प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना संपादक वैभव स्वामी म्हणाले, मराठवाड्याचा मागासलेपणा दूर करण्यासाठी उद्योग क्षेत्र या भागातील ग्रामीण क्षेत्रापर्यंत गेले पाहिजेत. मराठवाड्यात चांगले उद्योग त्याचवेळी येतील ज्यावेळेस या मराठवाड्यात गुणवंत कामगार घडतील.गुणवंत कामगार सातत्याने घडावेत यासाठीच यावर्षीपासून दैनिक समर्थ राजयोग आणि पत्रकार संघाच्या वतीने मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील प्रत्येकी एक याप्रमाणे गुणवंत कामगाराचा यापुढे प्रतिवर्षी दैनिक समर्थ राजयोगच्या वर्धापनदिनी बीड येथे जाहीर नागरी सत्कार करणार असल्याचे जाहीर केले. व्यासपीठावरील मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिनिधीक स्वरूपात पाच गुणवंतांना समर्थ गुणवंत कामगाररत्न पुरस्कार - २०२५ या पुरस्काराचे स्मृतिचिन्ह,शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन गुणगौरव करण्यात आला. या पुरस्काराचे पहिले मानकरी ठरले पूर्वी गुणवंत कामगार ठरलेले आणि सद्यस्थितीत मंत्रालयामध्ये स.संचालक माहिती आणि जनसंपर्क विभाग मंत्रालय मुंबई येथे कार्यरत असलेले श्री राजू धोत्रे, तसेच गुणवंत कामगार, प्रधानमंत्री श्रमवीर पुरस्कार व महाराष्ट्र शासनाचा कामगार भूषण पुरस्कार प्राप्त श्रीनिवास कळमकर, स्वतः उद्योग व्यवसाय सुरू करून भावी पिढ्यांसाठी आदर्श निर्माण करणारे राजकुमार मुंबरे, पर्यावरण, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, भावी पिढ्यांना करिअर मार्गदर्शन यासोबतच कामगारांच्या मुलांमध्ये उद्यमशीलता विकसित करण्यासाठी प्रयत्नशील असलेले गुणवंत कामगार पी.एस. गुजर, व्यसनमुक्ती प्रचारक राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्राप्त प्रदीप माळी,अन्न वाचवा समितीच्या माध्यमातून अन्नाचे महत्त्व विशद करणारे दिलीप आजबे यांचा गौरव करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष स सो खंडाळकर, सचिव मुकुंद कोकणे यांनी गुणवंतांचा गौरव केल्याबद्दल दैनिक समर्थ राजयोगचे आभार व्यक्त करून पुरस्कार प्राप्त गुणवंतांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र अजमेरा यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष पापडीवाल यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी जगन्नाथ काकडे, मारोती फुलारी,सुधाकर मांडोळे अशोक सोनवणे आदींनी परिश्रम घेतले. तर कार्यक्रमाला ॲड.नवाब पटेल, विनोद फरकाडे, सुधाकर मंडोले, अभिजीत थोरात, सुरेश वाकडे, उद्धव करडखेले, सुरेश टाक, मोहन हिप्पळनेरकर, सुभाष देवकर, दत्तात्रय ठुबे, गोविंदा आप्पा डांगे, सतीश सगरे, कॉ. दिगंबर शिंदे, शिवाजी राऊत आदीं उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# सावित्रीबाई फुले जयंती निमित्त भव्य रॅली संपन्न



बीड ।प्रतिनिधी

थोर समाजसुधारिका, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बीड शहर मध्ये भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीद्वारे स्त्री शिक्षण, सामाजिक समता व महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला.रॅलीची सुरुवात सकाळी ८.०० वाजता मिलीया हायस्कूल ते बशीर गंज चौक येथून झाली. विविध सामाजिक संस्था, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सहभागी नागरिकांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच शिक्षण हाच विकासाचा पाया, स्त्री शिक्षण - समाज परिवर्तन अशा घोषणा दिल्या.

रॅलीदरम्यान प्रेरणादायी फलक, घोषवाक्ये व वेशभूषेद्वारे सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणासाठीचे योगदान आणि सामाजिक परिवर्तनातील त्यांची भूमिका अधोरेखित केली.या रॅलीमुळे तरुण पिढीला सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची प्रेरणा मिळाली असून सामाजिक समतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मनोज ससे व जिल्हा बालसंरक्षण अधिकारी मंगेश जाधव यांच्या मार्गदर्शन खाली हा कार्यक्रम घेण्यात आला .या वेळी संरक्षण अधिकारी संतोष पाटील, जिल्हा चाईल्ड हेल्प लाईन च्या अश्विनी जगताप,पर्यवेक्षक स्वप्नील कोकाटे,प्रवीण वीर जिल्हा मिशन समन्व्यक (महिला सक्षमिकरण ) अर्चना वीर, स्वाती झनझने तसेच उपशिक्षणाधिकारी अंजुम शेख गटशिक्षण अधिकारी खान शिक्षण विस्तार अधिकारी मिलिंद तुरुकमारे तसेच बीड येथील मिलिया शाळेचे मुख्याध्यापक चाऊस फैसल आणि इतर ८ शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# दिव्यदृष्टी दिव्यांगांना सहानुभूतीपेक्षा सन्मानाची आवश्यकता - डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर

## ब्रेल महोत्सव २०२६ पारितोषिक वितरण आणि समारोप कार्यक्रम



लातूर ।प्रतिनिधी

लुई ब्रेल यांनी दृष्टी दिव्यांगासाठी सहा टिंबाची ब्रेल लिपी शोधून काढली आणि ब्रेल लिपीच्या माध्यमातून दृष्टी दिव्यांगाना दिव्य दृष्टी प्राप्त झाली. आज दिव्य दृष्टी दिव्यांगांना समाजाकडून सहानुभूतीपेक्षा सन्मानाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.

बियांड व्हिजन फाउंडेशन, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२, नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, लातूर शाखा, अंधजन विकास मंडळ, लातूर, रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ लातूर मिडटावून आदिशक्ती आणि लातूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, लि. यांच्यावतीने विश्व ब्रेल दिनाचे औचित्य साधून दि. ०२ ते ०४ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये लातूर येथे दृष्टी दिव्यांगांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी ब्रेल महोत्सव २०२६चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या पारितोषिक वितरण आणि समारोप कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजकल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार हे होते तर विचार मंचावर नॅबचे अध्यक्ष डॉ. विजयभाऊ राठी, राष्ट्रीय दृष्टीहीन संघाचे अध्यक्ष रघुनाथ बारड, लातूर अर्बन बँकेच्या संचालिका शुभदा रेड्डी, रोटरी सॅटेलाईट मिडटाऊन आदिशक्तीच्या मीरा देवणीकर, प्रा. डॉ. संजय गवई, वसंत हेगडे, सुधाकर घारापुरकर, लेखक दिनेश महाजन, अनिता महाजन, सुनील तोरडिया, बाबुराव सूर्यवंशी, डॉ. गुणवंत बिरादार, डॉ. माधव गोरे आणि अमोल निलंगेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. माधव गोरे यांनी केले, सूत्रसंचालन आणि आभार अमोल निलंगेकर यांनी मानले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप चोपडे, मीरा चोपडे, यश चोपडे, पद्मा धाबेकर, सत्यवान जोगदंड, किशोर ससाने, भोलेनाथ चव्हाण, वृषाली महाजन, मृणाली महाजन आणि सुमित भडके यांनी परिश्रम घेतले.

# नांदर जिल्हा परिषद शाळेमध्ये आंनदनगरी मेळावा उत्साहात संपन्न



दावरवाडी (प्रतिनिधी)

नांदर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये दि ३ जानेवारी रोजी सकाळी ९ते११ या वेळामध्ये आंनदनगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.. यावेळी विद्यार्थ्यांनी आप-आपल्या घरुन विविध प्रकारचे खाद्यपदार्थ तयार करून विकण्यासाठी शाळेत आणले होते. व शाळेच्या आवारात विद्यार्थांनी लावलेल्या विविध प्रकारच्या खाद्यपदार्थ स्टॉलने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले होते. तसेच या आंनदनगरीतुन विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळत असते हा उपक्रम शाळेच्या वतीने वर्षातून एक वेळेस विद्यार्थ्यांसाठी आनंदनगरी शाळेत घेतला जातो त्यावेळी उपस्थिती मुख्याध्यापक नवनाथ जाधव संरपंच विजय गायकवाड, उपसंरपंच आसमान दादा काळे, माजी उपसंरपंच रेवणनाथ कर्डीले, मित्रवर्धन काळे, ऊदयसेन काळे, संतोष भोसले, ईश्वर कांबळे, शालेय कमिटीचे अध्यक्ष लखन भावले, बाबु सोनवणे, नवनाथ सोनवणे, मुख्याध्यापक नवनाथ जाधव,अशोक बुद्धार,गायकवाड मॅडम, श्रीमती हंडाळ मॅडम ,आयनुले मॅडम श्रीमती, सोनटक्के मॅडम, चाबुकस्वार मॅडम,जया शिंदे, गोर्डे सर, श्री गायकवाड सर, बुधनर सर, भालसिंग सर, व गावातील सर्व युवक , विद्यार्थी याची यावेळी उपस्थिती दर्शवली होती



**बदनापूर (प्रतिनिधी)**

**साई मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये आज दिनांक ३ जानेवारी रोजी थोर समाजसुधारिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात, प्रेरणादायी आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्या सौ. जाधव मॅडम यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. जाधव सर यांनी केले. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत स्त्री शिक्षण, सामाजिक समता व समाजप्रबोधनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यानंतर सौ स्नेहा व सौ शिंदे मॅडम यांनी आपली भाषणे सादर केली.**




# दलितमित्र एकबाल पेंटर फाउंडेशन च्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा येथे जि.प. कन्या शाळा मध्ये माई सावित्रीबाई फुले यांची जयंती गेल्या ३५ वर्षापासून दलित मित्र एकबाल पेंटर हे स्वतः स्वखर्चाने दरवर्षी करत असतात. त्याच पद्धतीने यावर्षी अनेक शाळेतील विद्यार्थ्यांचे भाषण वकृत्व स्पर्धा व समाजामध्ये काम करणारे सामाजिक कार्यकर्ते यांना पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीचा पुरस्कार प्रा. मोहन परजणे सर यांना देण्यात आला. दलितमित्र एकबाल पेंटर फाउंडेशन च्या वतीने अनेक उपक्रम प्रत्येक वर्षी घेतले जातात. यामध्येच सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने मुला-मुलींचे भाषण स्पर्धेमध्ये अनेक मुलींना स्पर्धेचे बक्षीस म्हणून महापुरुषांची पुस्तके व त्यांना स्टेज करिअर मिळण्यासाठी ही स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येते. या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती प्रा.मोहन परजणे सर यांनी आपल्या मनोगतमध्ये मुलींनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेतला पाहिजे असे सांगितले, गणेश कवडे यांनी बोलतांना सांगितले की, मराठी शाळेबरोबरच उर्दू शाळेच्या मुलींनी पण भाषणामध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवल्या बद्दल कौतुक केले. एल आर जाधव सर बोलतांना सांगितले की, एकबाल पेंटर हे पाटोद्याचे भूषण आहे. दरवर्षी जयंती साजरी करतात त्यांचाआदर्श सर्वांनी घ्यावा,भाई विष्णुपंत घोलप यांनी सांगितले की,सावित्रीबाई फुले यांची जयंती आली की, आम्हाला पेंटर साहेबांची आठवण येते. कॉ. महादेव नागरगोजे, जाहेर पाटील, भाई विष्णुपंत घोलप ,एल.आर. जाधव , गणेश कवडे, हरीभगत सर, दिलीपराव गाडे, भगवानराव जावळे,देमा जावळे ,काळूशे सर, सय्यद इलियास,हादीसर,मुकरम बेग, नजान सर, खेडकर मॅडम,समिना बाजी,जबीन बाजी,तब्सुम बाजी,रफत बाजी,शेख फय्याज, सय्यद ईशरत, जावळे बाई, डिडुळ बाई ,बुद्रुक बाई , साठे, पारवे,सय्यद रेहान, सय्यद इम्रान,तसेच जिल्हा परिषद कन्या शाळेतील शिक्षक शिक्षिका व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# निवडणुकीची रणधुमाळी गावरान तडका : फक्त करमणूक



महाराष्ट्रामध्ये नगर परिषदा,नगरपालिका व महानगरपालिकेच्या निवडणुकीमुळे वातावरण दिवसेंदिवस तापले गेले असल्याचे दिसते.या निवडणुकीसाठी कोणी तरी एबी फॉर्म मिळवण्या साठी कोणाचे फार्म हाऊसचे दरवाजे तोडले, कोणी आपल्या ऐवजी दुसऱ्याला पक्षाने एबी फॉर्म दिला म्हणून त्याचा फॉर्म हिसकावून घेऊन गिळला परंतु प्रकरण अंगाशी आल्यावर फॉर्म गिळला नसून तो फाडला असल्याचा खुलासा प्रसार माध्यमांसमोर केला,तर कोणी रागाने दुसऱ्याला मिळालेला एबी फॉर्म फाडला.एका घरातील चार सदस्यासाठी काही तरी जुगाड करून चार एबी फॉर्म मिळवले व मात्र त्यानंतर प्रकरण अंगलट आल्यावर माफी मागत त्यापैकी दोन फॉर्म पक्षाकडे परत केले.या निवडणुकात इतर निवडणुकापेक्षा काहीतरी भलतंच घडलं हे मात्र खरं.काही ठिकाणी वडिलांच्या विरोधात मुलगा उभा राहिला,काही ठिकाणी सासूच्या विरोधात सून उभी राहिली,भावाच्याविरोधात बहीण उभा राहिली, भावाच्या विरोधात भाऊ उभा राहिला.आईच्या विरोधात मुलगी उभी राहिली.अशा प्रकारची आणखी कितीतरी कॉम्बिनेशनस असतील ही.परंतु मेहुणीच्या विरोधात मेहुणा उभा राहिला असे मात्र मला वाचायला किंवा ऐकायला मिळाले नाही हे मात्र खरे.

पुण्यात तर महाभयंकरच घडले.शेवटी आमच्या पुण्याचे काहीतरी वेगळेच म्हणतात ना पुणे तेथे काय उणे !! पुण्यात कोणाला उमेदवारी नाकारल्याने त्याचे अश्रू अनावर झाले,कोणातरी महिलेचे तर डोळेच पांढरे झाले,तिचा जीव जातो की काय ? या कल्पनेने क्षणभर घरातील लोकांचाच जीव जाण्याची वेळ आली,काय करावे आणि काय नाही ? हे त्यांना त्या क्षणी सुचत नव्हते,कोणातरी महिलेचे तिकीट नाकारल्यामुळे अतिव दुःखामुळे ती महिला घेरी येऊन पडली तर कोणी अंगावर रॉकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. एका ठिकाणी तर भयंकरच प्रकार घडला, पती-पत्नीने एकाच जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला.पतीने अर्ज मागे घेतल्याशिवाय सासरी नांदायला येणार नाही अशी शपथ घेऊन व तशी तंबी देऊन पत्नीने थेट माहेर गाठले ,तर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारी अर्ज मागे घेणार नाही,पत्नी परत आली नाही तरी चालेल परंतु आता कोणत्याही परिस्थितीत माघार नाही अशी ठाम भूमिका घेत पतीने शपथपूर्वक दृढनिश्चय केला असल्याचे समजले आहे.यात खरे किती खोटे किती माहित नाही.सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी, कल्याणासाठी,सेवेसाठीची स्वतःचा संसार उध्वस्त झाला तरी चालेल,प्राण गेला तरी बेहत्तर ही भावना मनात बाळगून उमेदवार तसेच त्याचे मित्र मंडळ व नातेवाईकांची चाललेली ही मनापासून ची समाजसेवेची तळमळ पाहिली की माझ्या सारख्या निर्मळ मनाच्या व भोळ्या,भाबड्या ज्येष्ठ नागरिकांच्या अंगावर अक्षरशः रोमांच उभे राहतात व अंगावर शहारे येतात,मन भरून येते, दिवसेंदिवस लोकशाही अधिक समृद्ध,दृढ व घट्ट होत आहे हे पाहून अक्षरशः अंतकरण हेलावते व क्षणभर



डोळ्यात आनंदाचे व अभिमानाने अश्रू येतात धन्य ते लोक व धन्य ती लोकशाही.

यानिमित्ताने शेवटी जनसामान्यांना एकच विनंती करतो की माणसे ओळखायला शिका,नाही तर तुमची आयुष्यभर फसगत व फरपट झाल्या शिवाय राहणार नाही.

या निवडणुकीच्या माध्यमातून नवनवीन फंडे व नवनवीन प्रकार पाहायला व ऐकायला मिळाल्यामुळे सर्व सामान्यांची करमणुक व मनोरंजन मात्र निश्चितच झाले आहे.

संकलन व संकल्पना:
प्राचार्य डॉ.आबासाहेब देशमुख,पुणे

# शिक्षकांचाच फक्त आदर व सन्मान होतो - गोकुळ बागलाने

## जो शिक्षक कर्तव्य श्रेष्ठ करतो त्याचाच इतिहास घडतो - मोहन काकडे




श्री.आजिनाथ मिसाळ यांचा सेवापूर्ती समारंभ संपन्न

आष्टी (राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पांगुळगव्हाण येथील आदर्श शिक्षक श्री. आजिनाथ बाजीराव मिसाळ यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला गौरव सोहळा शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता आष्टी येथील मोरेश्वर लॉन्स मंगल कार्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टी पंचायत समितीचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे साहेब होते.

प्रमुख पाहुणे म्हणून आष्टी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी सचिन राख, बीड जिल्ह्याचे माजी शिक्षणाधिकारी विक्रमराव पोकळे, माजी जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे, उद्योगपती देविदास डोंगरे, इंजि. वाय. आर. गर्जे, समाजसेवक दिपक नागरगोजे, किरण बांगर, ह. भ. प. दिनकर महाराज तांदळे, माजी केंद्रप्रमुख पी. वाय. काळे, चंद्रकांत शिंदे, केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे, माजी सरपंच रामदास जगताप, तुकाराम गिते, शिक्षण विस्तार अधिकारी सुरेश पवार, शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेशकुमार शिंदे, आय.टी. इंजिनिअर (स्पेन) अमित सांगळे, सरपंच बाबासाहेब गिते, सौ. लता गिते आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास ब्रम्हगाव केंद्रातील सर्व केंद्रप्रमुख, केंद्रीय मुख्याध्यापक, घटक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पांगुळगव्हाण गावातील ग्रामस्थ, महिला भगिनी तसेच शाळेचे विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भिमनगर येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार समुहनृत्याने कार्यक्रमाची शोभा वाढवली. या नृत्याचे मार्गदर्शन करणाऱ्या श्रीमती शैला कातखडे मॅडम यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक ब्रम्हगाव केंद्राचे केंद्रप्रमुख लक्ष्मण गर्जे यांनी केले. त्यांनी मिसाळ सरांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवाकालातील कार्याचा सविस्तर आढावा घेतला. यानंतर कु. पल्लवी खेडकर, सौ. अनुराधा सांगळे, श्रृषीकेश मिसाळ, मारुती पठाडे व दिलीप देवकाते यांनी आपली मनोगते व्यक्त करत मिसाळ सरांच्या कार्याचा गौरव केला. यानंतर अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते श्री. आजिनाथ मिसाळ व त्यांच्या सौभाग्यवती सौ. राणी मिसाळ यांचा ब्रम्हगाव केंद्राच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पहार, पुष्पगुच्छ व उभा पोशाख देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था यांच्या वतीने अध्यक्ष व संचालक मंडळाच्या उपस्थितीत मिसाळ सरांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

यावेळी राज्य पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षक व माजी केंद्रप्रमुख पी. वाय. काळे यांनी शिक्षकांना अध्यापनावर लक्ष केंद्रित करता यावे यासाठी ऑनलाइन कामांचा बोजा कमी करण्याची आग्रही मागणी केली. समाजसेवक दिपक नागरगोजे यांनी मिसाळ सरांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा उल्लेख करत त्यांच्या यशामागे पत्नी सौ. राणी मिसाळ - बांगर यांचा मोठा वाटा असल्याचे नमूद केले. माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे यांनी शिक्षकांनी आरोग्याची काळजी घेत व्यायाम, योग व प्राणायाम करावा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावेत, असे मत व्यक्त केले.

प्रमुख अतिथी गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांनी मनोगतात सांगितले की, प्रशासनात खऱ्या अर्थाने आदर व सन्मान फक्त शिक्षकांनाच मिळतो. इतर खात्यांमध्ये कितीही चांगले काम केले तरी एखादी चूक झाली तर टीका होते; मात्र शिक्षण विभागात शिक्षकांचा नेहमीच सन्मान केला जातो. शिक्षक हे खरोखरच आदर्श असतात. अध्यक्षीय भाषणात गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे यांनी उपस्थितांना नववर्षाच्या शुभेच्छा देत सांगितले की, जो शिक्षक आपले कर्तव्य श्रेष्ठ मानतो, त्याचाच इतिहास घडतो. मिसाळ सरांनी अनेक अडथळे पार करत आदर्श शैक्षणिक कार्य केले असून आष्टी तालुक्यातील शिक्षकांनी गुणवत्ता वाढीसाठी अधिक प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी मिसाळ सरांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन आदर्श शिक्षक बाळासाहेब तळेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन आदर्श शिक्षक श्रीराम लाळगे यांनी मानले.

# गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त पत्रकार गहिनीनाथ पाचबैल व आदर्श शिक्षिका श्रीम. चंद्रकला लाड यांचा भव्य सत्कार

आष्टी (राजेंद्र लाड)

आष्टी येथील भगवान महाविद्यालयाच्या वतीने गेल्या पंचवीस वर्षांपासून मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब यांच्या आई - वडिलांच्या स्मृतिपित्यर्थ गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान केला जातो. या पुरस्काराच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय सन्मान दिला जातो.

यावर्षीचा गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार दैनिक झुंजार नेताचे ज्येष्ठ पत्रकार व आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे सचिव गहिनीनाथ पाचबैल यांना प्रदान करण्यात आला. तसेच शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत मातकुळी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील सहशिक्षिका श्रीमती चंद्रकला लाड यांना गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा दि. ३१ डिसेंबर रोजी भगवान महाविद्यालय, आष्टी येथे मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब व पुरस्कार समितीच्या वतीने पार पडला.



या गौरवाबद्दल मातकुळी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा व शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने पत्रकार गहिनीनाथ पाचबैल व शिक्षिका श्रीमती चंद्रकला लाड यांचा भव्य सत्कार करण्यात आला. दैनिक झुंजार नेता या वृत्तपत्रातून गेल्या पंचवीस वर्षांपासून पत्रकारिता करताना गहिनीनाथ पाचबैल यांनी गोरगरीब, पीडित व वंचित घटकांच्या समस्या समाजासमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केल्यानेच त्यांना हा मानाचा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. तसेच शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत अनेक विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावणाऱ्या श्रीमती चंद्रकला लाड यांच्या कार्याची दखल घेत पुरस्कार समितीने त्यांना राज्यस्तरीय सन्मानाने गौरविले. त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे शाळेचा नावलौकिक वाढल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

या सत्कार समारंभास शाळेचे मुख्याध्यापक मधुकर गळगटे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बंकट आबा पाचबैल, सहशिक्षक सुनील सानप, बापू जायभाय, सिताराम माने, संजय सरडे, राजेंद्र भोसले तसेच व्यवस्थापन समितीचे सदस्य बाबुशेठ वीर, प्रतिष्ठित व्यापारी कांतीलाल जरे, सुनील डोके, भरत डोके, पिराजी धोत्रे, ग्रामपंचायत सदस्य अमोल डोके, डॉ. विकास जरे, मुबारक शेख, शब्बीर भाई, विठ्ठल मामा जरे, राम मामा जरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक मधुकर गळगटे यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्येष्ठ शिक्षक सिताराम माने यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळा व व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पोलीस वर्धापन दिनानिमित्त धाराशिव येथे शालेय विद्यार्थ्यांना शस्त्र माहितीच्या प्रदर्शनात

# विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

धाराशिव /प्रतिनिधी

शहर पोलीस ठाणे धाराशिव येथे पोलीस वर्धापन दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी पोलिस विभागातील शस्त्राची माहिती प्रदर्शन भरविण्यात आले होते,या प्रदर्शनात शस्त्र व सायबर गुन्हे,महिला व बालकांचे विरुद्ध गुन्हेगारी व इतर माहिती देण्यात आली आणि खाऊचे वाटप करण्यात आले.



शस्त्र माहिती सत्रकारिता पोलीस निरीक्षक कुमार दराडे,सहा.पोलीस निरीक्षक अंभोरे,पोलीस उपनिरीक्षक श्री.ओहोळ, पोलीस उपनिरीक्षक अक्षय दिघोळे, पोलीस अंमलदार ४२६ शिवाजी अनंतवाड, ९७० कनामे, २२४ रिजवान बेग, महिला पोलीस अंमलदार ६६८ चव्हाण,व होमगार्ड उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांनी मार्गदर्शन केले व शस्त्र बाबतची माहिती पोलीस उपनिरीक्षक अक्षय डिघोळे यांनी दिली.

शस्त्र सत्र प्रदर्शनात ६५ महिला विद्यार्थी ६० पुरुष विद्यार्थी ,०१ महिला शिक्षिका,०२ महिला वॉर्डन,०२ पुरुष शिक्षक यांनी सहभाग नोंदवुन पोलीस विभागातील शस्त्राची माहिती घेतली, प्रदर्शनात सहभागी झाल्या बद्दल पोलिस निरीक्षक कुमार दराडे यांनी आभार मानले.

# सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर येथे 'बाल आनंद मेळावा' उत्साहात संपन्न

बीड /प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमध्ये व्यवहार कौशल्य आणि आत्मविश्वास वाढीस लागावा, या उद्देशाने शहरातील सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर येथे नुकताच 'बाल आनंद मेळावा' अत्यंत उत्साहात पार पडला. या मेळाव्याला पालक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




या मेळाव्यात शाळेच्या बालचिमुकल्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत विविध स्टॉल्स लावले होते. यामध्ये प्रामुख्याने खाद्यपदार्थ घरगुती पौष्टिक फराळ आणि अल्पोपहार खेळणी व वस्तू: मुलांनी स्वतः तयार केलेल्या हस्तकला वस्तू आणि खेळणी इत्यादीची विद्यार्थ्यांनी स्वतः वस्तूंचे दर ठरवून त्यांची विक्री केली.

केवळ पुस्तकी ज्ञान न देता, प्रत्यक्ष जीवनात व्यवहार कसा करावा, ग्राहकांशी कसे बोलावे आणि हिशोब कसा ठेवावा, या गुणांचा विकास व्हावा हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांनी अतिशय चपळाईने स्टॉल सांभाळत आपल्या विक्री कौशल्याने सर्वांची मने जिंकली.

विद्यामंदिरआपल्या पाल्यांमधील हा उत्साह आणि आत्मविश्वास पाहून पालकांनी शाळेच्या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. या मेळाव्यामुळे मुलांच्या संवाद कौशल्यात आणि गणिती प्रक्रियेत मोठी सुधारणा झाल्याचे पालकांनी यावेळी नमूद केले.

आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ शिक्षण पुरेसे नाही, तर मुलांमध्ये व्यावसायिक दृष्टी आणि व्यवहाराचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या मेळाव्यातून मुलांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली.

- मुख्याध्यापक,सरस्वती प्राथमिक

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उत्तमरावजी पवार, नगरसेवक विनोद म्हणून नगरसेवक भैयासाहेब मोरे नगरसेवक रंजीत बनसोडे नगरसेवक प्रमोद शिंदे यांच्यासह पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संत वामनभाऊ महाराजांचा ५० वा सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळा उत्साहात सुरू

## आ.सुरेश धस यांच्या हस्ते विधिवत पूजन

आष्टी

श्री क्षेत्र गहिनीनाथ गड येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीनिमित्त आयोजित भव्य धार्मिक सोहळ्याला भक्तिभावपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित सप्ताहाच्या प्रारंभी आमदार सुरेश धस तसेच गडाचे महंत ह. भ. प. विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या हस्ते विधिवत पूजन संपन्न झाले. या पावन प्रसंगी संत वामनभाऊ महाराज यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी पादुकापूजन, समाधीपूजन तसेच पारंपरिक पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



आमदार सुरेश धस यांनी या सर्व धार्मिक विधींमध्ये सहभागी होत संतांच्या चरणी मनोभावे दर्शन घेतले.श्री संत वामनभाऊ महाराज यांचा जन्म इ. स. १८९१ मध्ये झाला असून २४ जानेवारी १९७६ रोजी त्यांनी देहत्याग केला. त्यानंतर २५ जानेवारी १९७६ रोजी त्यांची समाधी स्थापन करण्यात आली. या ऐतिहासिक घटनेला यंदा ५० वर्षे पूर्ण होत असून, यावर्षी शनिवारचा शुभयोग लाभल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत आहे. प. पू. विठ्ठल महाराज शास्त्री यांनी संतांची मठपरंपरा अखंडपणे जपली असून भक्ती, सेवा व अध्यात्माची परंपरा पुढे नेण्याचे कार्य अविरत सुरू ठेवले आहे. शनिवारी सकाळी होम -हवनाने या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याची सुरुवात झाली असून दैनंदिन अखंड कीर्तनसेवा सुरू राहणार आहे.

हा सप्ताह १० तारखेपर्यंत चालणार असून समारोपाच्या दिवशी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कालावधीत महाराष्ट्रासह विविध भागांतून लाखो भाविक गहिनीनाथ गड येथे दर्शनासाठी उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला असून संत वामनभाऊ महाराजांच्या विचारांचा आणि भक्तीमार्गाचा जागर या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मोठ्या श्रद्धेने साजरा केला जात आहे.

## आनंद मेळाव्यातून व्यवहार ज्ञानाचे धडे:देऊळझरी जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांकडून खाद्य पदार्थ विक्री

जाफ्राबाद ।हरी भालके

जाफ्राबाद:- जाफ्राबाद तालुक्यातील देऊळझरी येथे मेळाव्यात ४५ ते ५०स्टॉल लावण्यात आले होते. स्टॉलवर प्रत्येक विद्यार्थ्याने वेगवेगळे मेनू तयार करून ते विक्रीसाठी ठेवले होते. त्यात खमण, पाववडा, भजी, लाडू, मुरमुरा लाडू ,चिवडा, बर्फी, तिळीचे लाडू, समोसा, चहा, कुरकुरे, वेफर्स, चकली, पाणीपुरी, भेळ, रगडा आदी पदार्थांचा समावेश करण्यात आला होता. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतः च्या घरूण चविष्ट व चटकदार खाद्यपदार्थ बनवून आणले होते. स्टॉलची मांडणी, विविध पदार्थाची विक्री, खरेदी व विविध पदार्थाचा आस्वाद घेण्याचा आनंद मुलांनी लुटला. आनंद मेळाव्याला चिमुकल्या पासून ते अबाल वृद्धांनी या मेळाव्यात हजेरी लावली होती. विद्यार्थ्यांनी आणलेल्या सर्व खाद्य पदार्थाची गावकर्यांनी अतिशय उत्साहात खरेदी केल्या व खाद्य पदार्थाची विक्री झाल्याने चिमुकल्यांच्या चेहर्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. यावेळी ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांच्या पालकांनी मेळाव्याला हजेरी लावली. गुंतवणूक, नफा व केलेली बचत याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना बँकेच्या व्यवहारांची माहिती या उपक्रमाच्या माध्यमातून देण्यात आली. यावेळी जिनेंद्र काळे साहेबशिक्षण विस्तार अधिकारी जाफ्राबाद सोबत ए डी चिंचोले साहेब के प्र.वरूडउखळकर सर भराडखेडा बिट विस्तार आधिकारी फोलाने सर यांनी स्टॅला भेट दिली व जिनेंद्र काळे साहेब शिक्षण विस्तार अधिकारी जाफ्राबाद यांच्या हस्ते इंटर अँक्टिव्ह लर्निग पॅनल चे उद्घाटन करण्यात आले. व साहेबांनी सर्व विद्यार्थ्यांना ५००० रुपये बक्षीस दिले..यावेळी मुख्याध्यापक आवकाळे सर सुतार सरभुतेकर सर तुपकर सर मोरे सर खरात सर वाघमारे सर धोंडगे सर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष भोपळे., उपाध्यक्ष लक्ष्मण जारे श्रीरंग साळवे दादाराव भांबळे सिध्दार्थ भिसे परमेश्वर बकाल भागवत काकडे गजानन भोपळे सुदाम भोपळे विठ्ठल भोपळे.




# परतूर येथे 'व्हॉइस ऑफ मीडिया'ची तालुका कार्यकारिणी जाहीर

अध्यक्षपदी भाऊसाहेब मुके पाटील यांची बिनविरोध निवड तर सचिव पदी मुमताज अन्सारी

परतूर ।तारेख शेख

पत्रकारितेच्या क्षेत्रातील अग्रगण्य संघटना असलेल्या 'व्हॉइस ऑफ मीडिया'ची परतूर तालुका कार्यकारिणी २०२६ ची महत्त्वपूर्ण बैठक स्थानिक शासकीय विश्रामगृहात उत्साहात पार पडली. या बैठकीत सन २०२६ या वर्षासाठीची नूतन कार्यकारिणी सर्वानुमते घोषित करण्यात आली असून, तालुकाध्यक्षपदी 'दैनिक नवराष्ट्र'चे प्रतिनिधी भाऊसाहेब मुकें पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



या निवडीसाठी आयोजित बैठकीत तालुक्यातील ज्येष्ठ व तरुण पत्रकारांची मोठी उपस्थिती होती. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या प्रक्रियेत सचिवपदी मुमताज अन्सारी (बोलता महाराष्ट्र) कार्याध्यक्षपदी कैलास सोळंके पाटील (दैनिक रामविचार), उपाध्यक्षपदी अशोक ठोके (दैनिक युवक आधार) तर प्रवक्ते म्हणून अर्जुन पाडेवार (दैनिक सम्राट) यांची निवड निश्चित करण्यात आली.

यावेळी संघटनेच्या मार्गदर्शनासाठी अनुभवी सल्लागार मंडळाचीही घोषणा करण्यात आली. यामध्ये शिवकुमार भारूका, माणिक सरफराज नाईकवाडी,जैस्वाल,दैनिक समर्थ राजयोग चे तारेख शेख , प्रा. शरद बोराडे, राज भदर्गे, शेख अन्वर, आशिष गारकर, आशिष धुमाळ, राजकुमार भारूका, एम. एल. कुरेशी, भारत सवने, अफरोज शेख, अन्वर शेख,अजय देसाई आणि केदार शर्मा या ज्येष्ठ पत्रकारांचा समावेश आहे. पत्रकारांच्या प्रश्नांवर एकजुटीने लढा देण्याचा आणि संघटनेची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा संकल्प यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या नूतन कार्यकारिणीचे राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर स्वागत व कौतुक होत आहे.

# स्त्री शिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंब प्रगत होते

मंठा - येथील अशोका पब्लिक स्कूल, मंठा येथे भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, थोर समाजसुधारक व स्त्री शिक्षणाच्या जनक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे, कविता व प्रेरणादायी विचार सादर केले. त्यांच्या कार्यातून स्त्री शिक्षणाचे महत्त्व, स्त्रीस्वातंत्र्याची जाणीव आणि सामाजिक समतेचा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला.

यावेळी वक्त्यांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले यांनी प्रतिकूल परिस्थितीतही समाजातील वंचित, शोषित व महिलांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला केला. स्त्री शिक्षित झाली तर केवळ तीच नव्हे, तर संपूर्ण कुटुंब आणि समाज प्रगत होतो हा विचार त्यांनी कृतीतून सिद्ध करून दाखविला.

कार्यक्रमात शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या विचारांवर चालण्याचे, शिक्षणाला सर्वोच्च स्थान देण्याचे व समाजात समानतेचा संदेश पसरविण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, स्त्री शिक्षणाबाबत जागरूकता आणि प्रेरणा निर्माण झाली.सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेच्या शिक्षकवृंदाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडले.

# भावी जिल्हा परिषद सदस्य निवडणूक डोळ्यासमोर ठेवून करतायेत रस्त्यांची डागडुजी - डॉ. गणेश ढवळे

बीड /प्रतिनिधी

जिल्हा परिषद निवडणूक जवळ येताच अचानक रस्त्यांची तात्पुरती डागडुजी सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे.काही ठिकाणी खड्ड्यांवर माती टाकणे, खडी पसरवणे, नाममात्र डांबरीकरण करणे तर काही ठिकाणी स्वखर्चाने रस्ता केला असे गाजावाजा करत फोटो-व्हिडीओ सोशल मीडिया व स्थानिक वृत्तपत्रांत झळकू लागले आहेत. मात्र हा खरा विकास नसून निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेली दिखाऊ मलमपट्टी असल्याचा घणाघाती आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.



निवडणूक नसती तर हे रस्ते तसेच खड्डेमय राहिले असते. अपघातात माणसं गेली, अनेकजण जखमी झाले, तरी कुणालाही जाग आली नाही. आता मतांसाठी अचानक प्रेम उफाळून आले आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी दिली. ही डागडुजी तात्पुरती असून पावसाळा आला की परिस्थिती पुन्हा जैसे थे होणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. केवळ निवडणूकपुरते नव्हे तर दीर्घकालीन, दर्जेदार व टिकाऊ रस्ते बांधकाम व्हावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.या वेळी सचिन घरत, गौतम घरत, कृष्णा घरत, संतोष शिंदे, पिंटू घरत, दादाहरी घरत आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

महाजनवाडी ग्रामस्थांनी निकृष्ट रस्ताकाम अडवले

बीड तालुक्यातील बालाघाटावरील चौसाळा जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग मांजरसुंभा-पाटोदा-महाजनवाडी-बोरखेड या रस्त्याच्या डागडुजीचे काम सुरू असून सुमारे १० लाख रुपये खर्चाचे अंदाजे ८०० मीटर खडी-डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित पालक संवाद मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

## डॉ.राजेश इंगोले यांनी खुमासदार शैलीतून उलगडले पालकत्वाचे विविध पैलू ; महात्मा फुले स्मारक समितीचा उपक्रम

अंबाजोगाई (प्रतिनिधी) ज्ञानज्योती क्रांतीज्योती माई सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले स्मारक समिती व ढगे कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाईतील पालकांसाठी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या संवाद मेळाव्यास अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले हे प्रमुख व्याख्याते मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.




यावेळी विचारमंचावर योगेश्वरी महाविद्यालयाचे विभागप्रमुख प्रा.अनिल नरसिंगे, प्रा.डॉ.किरण चक्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती माई सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.राजेश इंगोले यांनी उपस्थित पालकांना सकारात्मक पालकत्व काय असते, हा कानमंत्र उपस्थित विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांना दिला. पालकत्व म्हणजे खूप मोठी जबाबदारी आहे आणि ती जबाबदारी योग्य रीतीने पार पाडल्यासच आपला पाल्य जीवनामध्ये चांगल्या पद्धतीने शिक्षण घेऊ शकतो, संस्कार आत्मसात करू शकतो, ध्येयाच्या दिशेने निश्चितपणे वाटचाल करू शकतो आणि यशाचे शिखर गाठू शकतो असा विश्वास डॉ.राजेश इंगोले यांनी उपस्थित पालकांना दिला. मुलांना मिळणारे शिक्षण हे संस्कारक्षम असले पाहिजेत तरच त्या शिक्षणाला अर्थ आहे अन्यथा ते दुधारी शस्त्र आहे. अनुवंशिकतेपेक्षा जीवनात पालकांकडून मिळणाऱ्या संस्कारांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पालकांचे अनेक प्रकार आहेत ज्यामध्ये घाबरलेले पालक, गोंधळलेले पालक, आंधळे पालक, स्वार्थी पालक, कडक पालक, दुर्लक्ष करणारे पालक, वटवृक्ष पालक, कटकटी पालक, भोळे पालक, डॉक्टर पालक, पैसा पैसा करणारे पालक, खा खा पालक, हॉटेलू पालक, तराजू पालक आणि स्वप्न लादणारे पालक अशाप्रकारे पालकांच्या विविध जमाती समाजामध्ये उपस्थित असतात असे सांगत या सर्व प्रकारांना संतुलितपणे समोर घेऊन जाणारा पालकच खऱ्या अर्थाने सकारात्मक पालकत्व निभावत आपल्या जबाबदारीला पार पाडत असतो. आपल्या पाल्याला यश मिळण्यापेक्षा ते यश मिळवण्याकरिता लागणारी गुणवत्ता विकसित करणे हे पालकाचे आद्य कर्तव्ये व जबाबदारी आहे असे डॉ.इंगोले यांनी सांगितले. आपल्या पाल्याला समोरच्याचे ऐकून त्यावर विचार प्रक्रिया करून आपलं स्वतःचं मत बनवू देणं ही प्रक्रिया ही पालकांनी मुलाला दिलेली सर्वोत्तम भेट असते. यावेळी बोलताना डॉ.इंगोले यांनी मुलांच्या वागणुकीत सकारात्मक बदल कसा घडवायचा, मुलांना स्फूर्ती कशी द्यायची, मुलांना वेळ कसा द्यायचा, मुलांना आदर कसा द्यायचा, मुलांची तुलना न करता त्याला योग्य दिशेने प्रेरणा कशी द्यायची, मुलांची स्वप्रतिमा चांगली बनविण्यासाठी आपल्या पाल्यांना मदत कशी करायची, मुलांचा व्यक्तिमत्व विकास कसा घडवून आणायचा तसेच मुलांच्या मनामध्ये काय चालू आहे हे कसे ओळखायचे, मुलांना मोबाईल टीव्ही इत्यादि व्यसनांपासून कसे दूर ठेवायचे, मुलांची बुद्धिमत्ता कशी वाढवायची, मुलांच्या क्रयशक्तीला कसा वाव द्यायचा आणि मुलांच्या शक्तीला पालकांची दिशा कशा प्रकारे द्यायची, मुलांच्या नेतृत्वगुणांचा विकास कसा करायचा यावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या दैनंदिन आयुष्यातील विविध उदाहरणे देत पालकत्वाचे विविध पैलू उलगडवून दाखवत आपल्या खुमासदार शैलीत उपस्थित पालकांना पालकत्वाची करून दिली. डॉ.राजेश इंगोले यांच्या सविस्तर मार्गदर्शनामुळे उपस्थित सर्व पालक भारावून गेले होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व पालकांनी उत्स्फूर्तपणे आपल्या विविध शंका विचारत त्याचे शंका निरसन करून घेतले. यावेळी उपस्थित पालकांनी डॉ.इंगोले यांचा सत्कार केला. यावेळी घेतलेल्या स्पर्धामधील विविध गुणवंतांचा सत्कार डॉ.इंगोले यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. मिलिंद ढगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार आदित्य कदम यांनी मानले.



## श्री संत भगवानबाबांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त भगवानगडावर उसळला भाविकांचा जनसागर !

मानूर /प्रतिनिधी ह्व

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचं दैवत ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांचा काल श्री क्षेत्र भगवानगडावर भव्य दिव्य पुण्यतिथी महोत्सव संपन्न झाला. या पुण्यतिथी सोहळ्यासाठी श्री क्षेत्र भगवानगडावर भव्य दिव्य मंडप उभारणी केली होती. भाविकांसाठी सुमारे शंभर क्विंटल साखरेपासून महाप्रसाद बनवला होता. वाहनांच्या पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था केलेली होती. भाविकांच्या वाहनांच्या सुयोग्य पार्किंग व्यवस्थेसाठी पोलीस प्रशासनासह घोगस पारगांव आणि भारजवाडीतील तरुणांवर जबाबदारी दिलेली होती. पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी अनेक संस्थानांहून व गावांतून लहान-मोठ्या अनेक दिंड्या श्री क्षेत्र भगवानगडावर आल्या होत्या. मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय काटेकोरपणे सर्व देखरेख केली होती.

काल सकाळी ९ वाजता ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांच्या समाधीची महापूजा संपन्न झाली. दुपारी १२ वाजता श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे काल्याचे कीर्तन झाले. त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसाद वाटप करून पुण्यतिथी कार्यक्रमाची सांगता झाली. भाविकांसोबत महंत शास्त्रीजींनी स्वतः स्टेजवर बसून श्री संत भगवानबाबांच्या पुण्यतिथीचा प्रसाद घेतला.

पुण्यतिथी सोहळ्यासाठी जमलेल्या लाखो भाविकांच्या वाहनांची पार्किंग व्यवस्था, संभाव्य चोरट्यांपासून महिलांची सुरक्षितता व इतर सुयोग्य व्यवस्थापनासाठी घोगस पारगांव, भारजवाडी, भालगांव आणि एकनाथवाडीचे स्वयंसेवक पोलीस प्रशासनाला सहकार्य केले.

## आंगनवाडीसेविका,आशा वर्कर्स व मध्यान भोजन बनवणारांच्या हक्कांसाठी भारतीय जनता मजदूर संघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

बीड/प्रतिनिधी

देशातील आंगनवाडी सेविकांना श्रमिक म्हणून वैधानिक मान्यता,किमान वेतन,सामाजिक सुरक्षा व पेन्शन यांसारखे मूलभूत हक्क मिळावेत,यामागणी साठी दि.३१ डिसेंबर २०२५ पासून भारतीय जनता मजदूर संघ यांच्या वतीने राष्ट्रव्यापी पत्र व निवेदन आंदोलन आयोजित आले.यावेळी बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.हा उपक्रम औपचारिक किंवा प्रतीका त्मक नसून,संविधानिक अधिकार आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अंमल बजावणी साठीचा गंभीर लोकशाही प्रयत्न असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.देशभरातील सुमारे २७ लाख आंगनवाडी सेविका गेल्या अनेक दशकांपासून माता बालक पोषण,सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक कल्याणाची जबाबदारी सातत्याने पार पाडत आहेत.मात्रआजही त्यांना श्रमिक दर्जा,किमान वेतन तसेच सामाजिक सुरक्षे पासून वंचित ठेवण्यात येत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.सर्वोच्च न्यायालयाने दीर्घकाळ नियमित व नियंत्रित स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना केवळ मानधनधारक स्वयंसेवक न मानता श्रमिक म्हणून मान्यता देण्याबाबत स्पष्ट भूमिका घेतली असताना ही प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. संघटनेने या प्रश्नांच्या निराकरणाची अपेक्षा सध्याच्या सरकारकडूनच असून,संघर्षाची भूमिका न घेता संविधानिक व संवाद आधारित मार्गाने हे ज्ञापनपत्र आंदोलन राबविण्यात येत आहे.या आंदोलनाअंतर्गत महिला व बाल विकास मंत्रालय, श्रम व रोजगार मंत्रालय, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय तसेच माननीय पंतप्रधान यांना निवेदन सादर करण्यात आले. दबाव




निर्माण करणे हा उद्देश नसून,धोरण,कायदा आणि प्रत्यक्ष परिस्थिती तील तफावत अधोरेखित करून सर्वोच्च न्यायालया च्या निर्देशांनुसार श्रम- सन्मान सुनिश्चित करण्या साठी सकारात्मक पावले उचलली जावीत,अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.दरम्यान, देशातील बौद्धिक वर्ग, शिक्षणतज्ज्ञ,धोरण विशेष तज्ञ आणि विचारवंत नागरिकांनी याविषयाकडे भावनिक नव्हे तर कायदेशीर,संविधानिक व नीतिगत दृष्टिकोनातून पाहून न्याय्य तोडगा काढण्यासाठी पुढाकार घ्यावा,असे आवाहनही संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन देण्यात आले. यावेळी भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके,प्रमोद पुसरेकर, विक्रम गायकवाड, किशोर कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## गोरक्षनाथ मुंडे, तुकाराम राठोड व रमेश धायतिडक यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या हस्ते सन्मान

वडवणी (प्रतिनिधी):- बीड जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा शिक्षण क्षेत्रातील मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार वडवणी तालुक्यातील गोरक्षनाथ मुंडे सर सोन्नाखोटा, तुकाराम राठोड सर शेरी बोरखडी, आणि रमेश धायतिडक सर कोठारबन यांना जाहीर करण्यात आलेला होता. नुकत्याच बीड येथे पार पडलेल्या भव्य पुरस्कार प्रदान सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या शुभहस्ते या तिन्ही गुरुजनांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करुन त्यांचा सन्मान करण्यात आला. या पुरस्काराबध्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, बीड जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने नुकताच मागील तीन वर्षांपासून रखडलेला जिल्ह्यातील सर्व आदर्श शिक्षकांचा पुरस्कार वितरण सोहळा नुकताच मोठ्या दिमाखात बीड याठिकाणी संपन्न झाला. यामध्ये बीड जिल्हा परिषदेचा सन २०२३ मधील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सोन्नाखोटा शाळेचे प्राथमिक पदवीधर गोरक्षनाथ मुंडे सर, तसेच सन २०२४ मधील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेरी बोरखडी शाळेचे सहशिक्षक तुकाराम राठोड सर, आणि सन २०२५ मधील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा



कोठारबन शाळेचे प्राथमिक पदवीधर रमेश धायतिडक सर यांना जाहीर करण्यात आला होता. नुकत्याच बीड येथे पार पडलेल्या भव्य पुरस्कार प्रदान सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या शुभहस्ते या तिन्ही गुरुजनांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करुन त्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये पुरस्कारप्राप्त गोरक्षनाथ शेषेराव मुंडे हे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सोन्नाखोटा याठिकाणी प्राथमिक पदवीधर पदावर कार्यरत असून त्यांची एकूण सेवा १९ वर्षे पूर्ण आहे. त्यांनी कोरोना काळात प्राथमिक आरोग्य केंद्र वडवणी येथे डाटा ऑपरेटर म्हणून कामं केले. स्पर्धा परीक्षेसाठी महत्त्वाचे योगदान मंथन, नवोदय, शिष्यवृत्ती, एनएमएमएस, सैनिकी स्कूल व तत्सम परिक्षा, शालेय परिसर वृक्ष लागवड व संवर्धन असे त्यांचे योगदान आहे. त्यानंतर तुकाराम गंपू राठोड सर हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेरी बोरखडी याठिकाणी सहशिक्षक पदावर कार्यरत असून त्यांची एकूण सेवा २२ वर्षे पूर्ण आहे. गेल्या २२ वर्षांपासून त्यांनी शिक्षण क्षेत्रात भरीव काम करुन गोरगरिबांच्या विद्यार्थ्यांना घडविण्याचे प्रामाणिक काम केलेले आहे. वडवणी तालुक्यातील पहिली सेमी इंग्लिश स्कूल व पहिली ज्ञानरचनावादी शाळा केली आहे. लोकसभागातून शाळेला कुंपण, अनाथ विद्यार्थ्यांना आधार माणुसकीचा प्रतिष्ठान तर्फे लेखन साहित्याचे वाटप व शिक्षण क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने प्रतिष्ठान तर्फे गौरवण्यात येते. त्यानंतर रमेश रावसाहेब धाईतिडक सर हे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कोठारबन याठिकाणी प्राथमिक पदवीधर पदावर कार्यरत असून त्यांची एकूण सेवा २६ वर्षे पूर्ण आहे. गेल्या २६ वर्षांपासून त्यांनी शिक्षण क्षेत्रात भरीव काम करुन गोरगरिबांच्या विद्यार्थ्यांना घडविण्याचे प्रामाणिक काम केलेले आहे. तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थी हे विविध शालेय स्पर्धांमध्ये जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये चमकलेले आहेत. या अशा तिन्हीही खऱ्या जीवनातील आदर्श गुरुजनांना बीड जिल्हा परिषदेने आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करणे वडवणी तालुक्यासाठी निश्चितपणे आनंदाची व अभिमानाची बाब असल्याची प्रतिक्रिया वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी याप्रसंगी व्यक्त केली. तसेच या तिन्ही गुरुजनांचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, शिक्षण विस्तार अधिकारी नानाभाऊ हजारे, सर्व केंद्रप्रमुख, केंद्रिय मुख्याध्यापक, घटक शाळांचे मुख्याध्यापक, गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी वृंद, तिन्ही शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व पदाधिकारी, पालक वर्ग, विद्यार्थी व सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले आहे. बीड येथील या भव्य शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळयास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार, खासदार बजरंग बप्पा सोनवणे, आमदार प्रकाश दादा सोळंके, आमदार सुरेश आण्णा धस, आमदार विजयसिंह राजे पंडित, आमदार संदिप भैय्या क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, शिक्षणाधिकारी माध्यमिक प्रियाराणी पाटील, शिक्षणाधिकारी प्राथमिक डॉ.किरण कुंवर यांसह शिक्षण क्षेत्रातील असंख्य मान्यवर उपस्थित होते. या पुरस्काराबध्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावर संत वामनभाऊ महाराज यांचा

### ५० वा सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळा; उद्यापासून यज्ञ व सप्ताहास प्रारंभ



पाटोदा ,आजीज शेख

बीड जिल्ह्यातील आध्यात्मिक केंद्र असलेल्या श्री क्षेत्र गहिनीनाथ गड (चिंचोली नाथ, ता. पाटोदा) येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्याचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. उद्या, दिनांक ३ जानेवारीपासून ते १० जानेवारी या कालावधीत संपन्न होणाऱ्या भव्य यज्ञ सोहळा आणि अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर, आज आ.सुरेश धस व मान्यवरांनी गडावर उपस्थित राहून दर्शन घेतले व तयारीचा आढावा घेतला.

सोहळ्याच्या प्रारंभी श्री संत गहिनीनाथ महाराज आणि श्री संत श्रेष्ठ वामनभाऊ महाराज यांच्या समाधीचे आ.सुरेश धस मनोभावे दर्शन घेऊन आशीर्वाद घेण्यात आले. यावेळी गडावर भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले. ५० व्या पुण्यतिथीचे वर्ष असल्याने यंदाचा सोहळा 'सुवर्णमहोत्सवी' म्हणून अत्यंत मोठ्या स्वरूपात साजरा केला जात आहे.

महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्याकडून माहिती

याप्रसंगी गडाचे महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या समवेत पुण्यतिथी महोत्सवाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शास्त्रीजींनी या आठवडाभर चालणाऱ्या कार्यक्रमांची रूपरेषा, यज्ञ सोहळा आणि येणाऱ्या भाविकांसाठी करण्यात आलेल्या सोयी-सुविधांबाबत सविस्तर माहिती दिली. यानंतर संपूर्ण मंदिर परिसराची आ.सुरेश धस यांनी नियोजित सोहळ्याच्या ठिकाणाची पाहणी करण्यात आली.

ग्रामस्थांचा मोठा सहभाग

यावेळी चिंचोली नाथ गावचे सरपंच, गावातील ज्येष्ठ मंडळी, प्रतिष्ठित नागरिक तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. गडावर येणाऱ्या हजारो भाविकांच्या स्वागतासाठी आणि सोहळा यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ व स्वयंसेवक मेहनत घेत आहेत.

३ ते १० जानेवारी दरम्यान विविध कार्यक्रमउद्यापासून सुरू होणाऱ्या या सोहळ्यात दररोज काकड आरती, भजन, कीर्तन, प्रवचन आणि यज्ञ विधी पार पडणार आहेत. १० जानेवारी रोजी सोहळ्याची सांगता होईल. या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने पाटोदा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून भाविक दर्शनासाठी गडावर येणार आहेत.

## आ.प्रकाश सोळंकेंचा पुन्हा एकदा वडवणीकरांना झोळी भरुन निधी


वडवणी /प्रतिनिधी

बोले तैसा चाले, त्यांची वंदावी पावले. याच उक्तीप्रमाणे वडवणीकरांसाठी विधानसभा माजलगांव मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी वडवणीकरांना प्रत्येक वेळी दिलेल्या शब्दाप्रमाणे आपली कृती प्रत्यक्षात उतरवलेली आहे. आपला कामाचा माणूस याप्रमाणे प्रकाशदादांनी पुन्हा एकदा वडवणीकरांना अक्षरशः झोळी भरून निधी दिला असून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ योजनेंतर्गत वडवणीतील सीसीटीव्ही बसविण्यासाठी ३ कोटी तर चिंचवणच्या तीन मंदिरांच्या जिर्णोध्दारासाठी ९ कोटींचा निधी असा एकूण तब्बल १२ कोटी रुपयांचा निधी देण्यास अंतिम प्रशासकीय मान्यता देण्यात आली

असून या माध्यमातून आ. प्रकाश सोळंकेंचे आपल्या मतदारसंघातील वडवणीवर पुन्हा विशेष प्रेम दिसून आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या माध्यमातून सध्या वडवणी शहरासह तालुक्याचा चौफेर विकास दृष्टीक्षेपास पडत असून विविध नवनविन विकास कामांमुळे वडवणीचे रुपडे पालटताना दिसून येत आहे. तालुक्यातील जनता या विकास कामांवर समाधानी असून यामुळे आपल्या शब्दाचे पक्के असणाऱ्या प्रकाशदादांना वडवणीकर धन्यवाद देत आहेत. वडवणी येथील एका कार्यक्रमामध्ये वडवणी शहराचे नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप यांनी स्वतः आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या समक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे वडवणी शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यासाठी २ कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा

.सध्या अत्यंत आकर्षक अशा बांधकाम सुरु असणाऱ्या नविन नगरपंचायत प्रशासकीय इमारातीच्या बांधकामासाठी निधी कमी पडत असलेल्या उर्वरित कामासाठी २ कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा अशी आग्रही मागणी केली होती. त्यांच्या याच मागणीची आता पूर्तता झालेली असून नुकतेच सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ योजनेंतर्गत वडवणी तालुक्यामध्ये विविध ठिकाणी सीसीटीव्ही आस्थापित करणे यासाठी तब्बल १३ कोटींचा निधी तसेच चिंचवण जगदंबा येथील मंदिर जिर्णोध्दारासाठी ३ कोटी २८ लक्ष ८४ हजार रुपये निधी व चिंचवण येथीलच महादेव व विठ्ठल रुक्मिणी मंदिर जिर्णो ध्दारासाठी ५ कोटी १५ लक्ष ५० हजार रुपयांचा निधी अशाप्रकारे चिंचवण येथील तिन्ही मंदिरांच्या जिर्णोध्दारासाठी तब्बल एकूण ८ कोटी ४४ लक्ष ३५ हजार रुपयांचा निधी व दोन्ही कामांसाठी एकूण तब्बल १२ कोटी रुपयांचा निधी देण्यास अंतिम प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वडवणी नगरपंचायतीच्या बांधकाम सुरु असलेल्या



नव्या प्रशासकीय इमारतीच्या उर्वरित कामांसाठीही उर्वरित १ कोटी रुपयांचा निधी लवकरच मिळणार आहे. तसेच आता वडवणी शहराच्या वैभवात आणखी भर घालण्यासाठी व नागरिकांच्या सोयीसाठी शहरातील मुख्य रोडवरवरील दुभाजकांमध्ये ठिकठिकाणी हायमास्ट स्ट्रीट लाईट पथदिवे बसविण्यासाठी आवश्यक असणारा कोट्यावधी रुपयांचा निधीही लवकरच वडवणी शहरासाठी देणार असल्याचा शब्दही आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी दिला असल्याची माहिती वडवणी नगरीचे नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप यांनी दिली आहे.